
अंक ४ था ]

[ वर्ष २८ वें.

# " श्री साईलीला "

त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री सा ई ली ला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २८ ] त्रैमासिक–ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, १९५१ [ अंक ४ था

## —: संपादकीय :—

मागच्या अंकांत 'श्रीसाई'चा अर्थ सांगितला पण तो समजण्यास किंवा त्याची ओळख करून घेण्यापूर्वी आपण आपली ओळख करून घेतली पाहिजे. प्रपंच काय अगर परमार्थ काय, ज्याला स्वतःची ओळख पटली त्याला प्रपंच–परमार्थ अभेद आहे असेंच वाटेल. " आम्हीं संसारी आहोंत, आम्हांला वेळ मिळत नाहीं, आम्हीं घाण्याला जुंपलेले बैल आहोंत; सांगणें सोपें पण करणें कठीण " या ना त्या तऱ्हेची बडबड बंद होईल. प्रपंचांत देखील जो आपणा स्वतःस चांगला ओळखतो तोच दुसऱ्यास चांगला ओळखील. स्वतःचीच शुद्धी नसेल तर दुसऱ्याची बेशुद्धी किंवा शुद्धी यास कशी कळणार? प्रपंचांत जो आपला दर्जा वा योग्यता जाणून कार्य करतो तो इतरांचा व्यवहार करतांना सुख पावतो. जगांतील व्यवहारांत लहान मुलांच्या शिक्षणापासून तों मोठ्या राज्यक्रांतीसारख्या प्रकरणांत जे मोठमोठे आघात होतात त्याच्या मुळाशीं आपली आपणांस न होणारी ओळख हीच होय. याकरितां प्रपंचांत अगर परमार्थांत शिरण्या-

पूर्वी आपण आपली ओळख करून घेतली पाहिजे; नाहींतर अनर्थ घडतील व खरें तत्त्व समजणार नाहीं.

विश्वकर्त्यानें विश्वाची अफाट रचना करून जिवाला जीवपणाची जाणीव देऊन जीवदशेला येण्याकरतांच जाणीव–नेणीवेनी पूर्ण असलेली मानवाकृति निर्माण केली. मानवाचें ह्या अफाट विश्वांत आपलेपणाचें नातें शोधून काढणें हें आद्यकर्तव्य होय. विश्वांतील अगदीं आपल्या जवळची वस्तु म्हणजे आपलें शरीर, त्याहिपेक्षां जवळ आपलें मन व त्याहिपेक्षां जवळची वस्तु आपला आत्मा. आपली ओळख म्हणजे आत्म्याची ओळख, आत्मा म्हणजे आपण, ‘ आत्मा ’ हा संस्कृत शब्द आहे. त्याचाच प्रतियोगी ‘ आपण ’ हा प्राकृत आहे.

साडेतीन हात देहाचेंच ज्ञान असलेला साधारण मनुष्य औट घटकेच्या राज्यांतच भटकत असतो व त्याच्या पलिकडे त्याची नजर जात नाहीं.

सर्व देहांत नरदेह श्रेष्ठ होय; असा दुर्लभ मानवदेह प्राप्त झाला असतां जो स्वार्थ साधणार नाहीं तो शतमूर्ख. मनुष्य स्वार्थी असून त्याला स्वार्थ साधतां येऊं नये ? कारण स्वार्थ म्हणजे स्व+अर्थ. स्वः–आपण अथवा आपलें. अर्थ=ज्ञान–आपणाबद्दलचें ज्ञान म्हणजेच आत्मज्ञान. पण हें घडत नाहीं. ज्या शरीरास आम्हीं ‘ आपण ’ म्हणतों तें जड, अतएव काष्ठवत् ज्ञानहीन आहे. पण ज्या अर्थी आपण त्या शरीरास जाणतों त्याअर्थी आपण ज्ञानस्वरूप आहोंत. ज्ञानालाच चैतन्य म्हणतात. याचा विसर पडल्यामुळेंच, “ तुज आहे तुजपाशीं पण जागा चुकलासी ” ( तुकाराम ) जन्ममरणाच्या वारीची शृंखला पायांत अडकली आहे ही दुःखदायक असलेली जन्ममरणाची बेडी तोडण्याचे भगीरथ प्रयत्न या नरदेहांत करणें आहे. एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा भास होणें यासच भ्रम म्हणतात. देहावर आत्म्याचा व आत्म्यावर देहाचा भ्रम म्हणजे देहास आपण मानणें व आपणांस देह समजणें हें नातें जडल्यामुळें खरा स्वार्थ साधतां येत नाहीं. याकरतांच,

चित्तस्य शुद्धये कर्म नतुवस्तुपलब्धये ।
वस्तुसिद्धि विचारेण न किंचित्कर्म कोटिभीः ॥

आचार्य विवेक

**अर्थः**—फक्त चित्तशुद्धीकरितांच कर्माचा उपयोग, आत्मवस्तूच्या प्राप्तीकरतां नव्हे, आत्मवस्तूची सिद्धी विचाराच्या योगानें होते. कोट्यावधि कर्मांच्या योगानें कांहीं सुद्धां होणार नाहीं.

अतो विचारः कर्तव्यो जिज्ञासोरात्मवस्तुनः ।
समासाद्य दयासिन्धु गुरुं ब्रह्म-विदुत्तमम् ॥

**अर्थः**—याकरितां आत्मस्वरूप जाणण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें दयेचा केवळ सागर अशा उत्तम ब्रह्मवेत्त्या गुरूला शरण जाऊन आत्मस्वरुपाचा विचार समजून घ्यावा. इ.

चिरपरिचित जीवाचा मित्र । सहवास ज्याचा दिवसरात्र ।
त्याचें न मज रेखटावे चित्र । संतचरित्र काय लिहूं ? ॥

अलिकडे मानवाचा कल धर्माकडे नाहीं. त्यांना गुरु म्हणजे मोठा बाऊ वाटतो. कोणत्याही गोष्टीचें महत्त्व समजल्यानंतर तिजविषयीं आवड उत्पन्न होणार. पण महत्त्व समजण्याइतकी त्याच्या अंतःकरणाची योग्यता नसते. मन तर्ककुतर्कांनें पूर्ण भरलेलें असलें मग गुरु काय शिकविणार ? वेदान्त म्हणजे संसार सोडा. आसक्ती तोडा आणि सर्वांवर लाथ मारून देव जोडा. आज ( अहिक ) मिळत असलेल्या सुखावर लाथ मारा, सुखांतला जीव दुःखांत घाला. आणि पुढें शाश्वत सुख मिळणार या भरवंशावर रडत बसा हें कोणाला पाहिजे ! हें कर्म तर मोठें कठीण व सर्व सुखांस आंचवण्याचें असें त्यांना वाटतें. याचें कारण एवढेंच कीं, चित्ताची शुद्धी झालेली नसते. चित्त या शब्दांत मूळ धात्वोर्थ " चित् " असा आहे, आणि ' चित् ' म्हणजे चैतन्य आणि तें तर आपल्या जिवात्म्याचें मुख्य स्वरूपच आहे; दुसरा जो तकार आहे तो विषयाध्यासरूप आहे; अर्थात् अव्यक्त रूप चैतन्याला प्रतीत करण्यास जो कोणी उपाधीभूत पदार्थ चैतन्याशीं तादात्म्य पावलेला आहे त्याचें नांव **चित्त**.

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ।
व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥
विष तें अमृत आघात तें हित ।
अकर्तव्य नीत होय त्यांसी ॥ २ ॥
दुःख तें देईल सर्व सुखफल ।
होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥
आवडेल जीवा जीवाचिये परी ।
सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥
तुका म्हणे कृपा केली नारायणें ॥
जाणिजे तें येणें अनुभवें ॥ ५ ॥

बेशुद्धी झालेले दुःख समजत नाहीं. डॉ. क्लोरोफार्म देऊन ऑपरेशन करताल तें त्याला समजत नाहीं. दारु पिऊन धुंद झालेल्या मनुष्याचें दगडावर आपटून कपाळ फुटलें व त्यांतून रक्त वाहूं लागलें अगर एखादी गाडी पायावरून गेली व पाय मोडला तरी त्याला त्या दारूच्या नशेंत कांहीं कळत नाहीं. शुद्धीवर आल्यावर मात्र त्याला ब्रह्मांड आठवतें. तसेंच सत्कर्माचे योगें चित्त शुद्ध झालें म्हणजे आपण भोगीत असलेलें संसारांतील सुख हें सुख नसून दुःख आहे व या दुःखसागरांतून केव्हां मुक्त होईन अशी तळमळ लागते. अशा दुःखमुक्ततेची तळमळ लागणाऱ्या पुरुषासच **मुमुक्षु** म्हणावें.

या मुमुक्षूंचे तीन भेद आहेत. मंद, तीव्र, व तीव्रतर, ज्यांना परमार्थाची खरी आवड आहे त्यांनी देहाभिमान टाकून सद्‌गुरुचरणीं–संतांचे चरणी लीन झालें पाहिजे. अलिकडे सर्वच विद्वान व पंडित झाले आहेत व मीच शहाणा, मला काय करावयाचें आहे. ज्ञानेश्वरी नाहींतर साईसत्‌चरित्र वाचलें म्हणजे झालें !

अंगीं बहुश्रुतपणा असेल व ईश्वरदत्त सूक्ष्म विचार करण्याचें बुद्धिसामर्थ्य असेल तर ग्रंथ वाचनानें परोक्ष ज्ञानास मदत होईल; आणि यासही ईश्वरानुग्रहच पाहिजे. प्रत्यक्ष गुरुमुखानें वेदान्तशास्त्र श्रवण करावें अशी शास्त्राज्ञा आहे. नसल्यास आपल्या उपास्य देवतेच्या समोर ग्रंथ ठेवून त्या देवतेस सद्‌गुरु मानून, गुरुमुखानेंच आपण ग्रंथ श्रवण करीत आहोंत अशी भावना करावी व वाचूं लागावें म्हणजे प्रसाद लवकर होईल असेंही सांगितलें आहे. तात्पर्य आपली गुरुत्वाची भावनाच आपणांस तारक आहे. कारण मन ज्या वस्तूचें चिंतन करतें त्या वस्त्वाकार तें होतें. सुख व दुःख यांचा अनुभव येणें हाच फलभोग आहे. अर्थात् सुख व दुःख यांच्यापलिकडे फल म्हणून कांहीं नाहीं. जगांतील कोणताही प्राणी कोणतेंही कर्म करो, त्याचें फल एक तर सुख असेल अथवा दुःख असेल. पुण्यकर्मांचें फल सुख व पापकर्मांचें फल दुःख; आणि या सुखदुःखांचा अनुभव अंतःकरणाच्या वृत्तीच्या द्वारेंच येतो. परमार्थप्राप्तीस सात्वीक वृत्तीचीच आवश्यकता आहे व ती गुरुभावना केल्यानेंच उत्पन्न होते व मग तें अंतःकरण अध्यात्म-विद्येला योग्य होतें. आपणाकडे लघुत्व घेतल्यावांचून दुसऱ्यास गुरुत्व देतां येणार नाहीं. लघुत्व घेणें म्हणजे 'मीपणा'–अहंकार सोडणें, हेंच परमार्थाचें मुख्य कर्तव्य आहे. अहंकार हा परमार्थांतला मोठा शत्रू आहे. आणि त्याला समूळ नाहींसा करण्यास गुरुभावाशिवाय इतर साधनें फोल ठरतात.

अर्जुनाचें व श्रीकृष्णाचें जरी सख्य होतें तरी 'शिष्यस्तेऽहं शाधिमां त्वां प्रसन्नम्' असें अर्जुनाला म्हटल्याशिवाय श्रीकृष्णानें गीता सांगण्यास आरंभ केला नाहीं. श्रीराम ।। परब्रह्म आपण । तोही वैराग्य दावी पूर्ण । वसिष्ठा तूं ज्ञानसंपन्न । उपदेशू श्रीरामू ।। आजि तुज सारिखा सद्‌गुरु । आणि श्रीराम वैराग्याचें पूर्ण तारुं । कासया लाविसी उशीरू । ज्ञानदाना ।। वशिष्ठ म्हणे विश्वामित्रासि । ज्ञानोपदेश करी रघुनाथासीं । येरू म्हणे तुमच्या शिष्यासी । उपदेशावया मज सांगो नये ।। आणिकाचा शिष्य सुबुद्धि । आपण बोधूं नये स्वार्थबुद्धि । चालवितां दूषणाब्धी । पडिजे जाण ।। यालागीं सूर्यवंशीं तूं कुळगुरु । ज्ञानोपदेश वक्ता चतुरु । श्रीराम वैराग्यें उदारू । उशिरू येथें न लावी ।। वैराग्य बाणलिया शिष्यासी । विलंब करूं नये ज्ञानोपदेशीं । आत्मविद्या सच्छिष्यासी । द्यावी तात्काळ ।। मग वशिष्ठ म्हणती परियेसा । शिष्यासी वैराग्य झाले सहसा । परी गुरुसी न प्रार्थितां उपदेशा । पात्र नव्हे ।। गुरुसी शरण येऊनी प्रश्न । शिष्य न करी जव आर्त होऊन । तंव उपदेश करणें हें दूषण । गुरुत्वासी ये ।। अभिलाषें करुनि बलात्कारें । शिष्याशी उपदेशीजे सादरें । तेथें गुरुचे ओम पडे खरें । सांप्रदायही ।। ऐसें

बोले जंव वसिष्ठऋषी। तंव श्रीराम उठोनी लागे चरणासीं। म्हणे शरण आलों स्वामीसीं। उद्धरीं मज ॥

रंगनाथी योग वासिष्ठ सार प्र. १

ओं. ३५५–६४

याकरितां साधकानें देहाभिमान टाकून तत्वज्ञात्यास शरण गेलें पाहिजे. कांहीं सूज्ञांचीं मतें फारच विचित्र असतात. त्यांच्या मतें साधूनीं संसारांत राहूं नये, बायकामुलें असूं नये, त्यांनीं कोणावर रागावूं नये, इतकेंच काय पण त्यांनीं गवत खाऊन नाहीतर जें मिळेल त्यांत समाधान मानून, लोकांचा छळ सोसून पडल्या दगडांचा मार सुद्धां खावा. आणि अशा तऱ्हेचा एखादा विरक्त दिसला म्हणजे हे लोक त्यांच्या पाया पडणार व मागणार काय ? तर मला मूल व्हावें, पैसा मिळावा, दुखणीं दूर व्हावीं इत्यादि; या लोकांना श्रीसंत म्हणतात;

अज्ञान जनांचिया मना। ज्ञातेयें (=ज्ञात्यानीं) असावें पाषाण मना। विषयसुख सेवना। सेवूंचि नये ॥ म्हणती आम्हांसारिखा। मा तेथ कवण साधु लेखा। येही घेऊनी आशंका बुडाले ते ॥ ज्यांचिया दिठीचें लाघव। साधूं का धरी विषयभाव। तया चेतनाधृति अभिमाव। केवीं कळे ॥ ययापरी बुडाले। पाषांड अवकळे वरियेले। तया महासुख आंतले। कैं कळों सकें—

याप्रमाणें भलत्या–सलत्या शंका घेऊन आपल्या लाभास आंचवूं नये. आपण गुणग्राही असावें. चांगलें तेवढें घ्यावें व वाईटाकडे दुर्लक्ष करावें. दोषावर दृष्टी देऊन पहात राहिलें म्हणजे त्यांत आच्छादून असलेले अमोलिक गुण आपणांस लाभत नाहीं. उलट संतांच्या संगतींत आपले असले दोष मात्र जातात. दोष सहा प्रकारचे असतात. (१) सहनदोष–देहापासून उत्पन्न होणारे, शूद्र चांडालादि जातींत जन्म होणें. (२) देशोत्थ दोष–देशापासून उत्पन्न होणारे, पूजास्थान अपवित्र असणें म्लेंछांच्या राज्यांत असणें. (३) कालोत्थ दोष :–समयाला अनुसरून उत्पन्न होणारे, कलिकाल किंवा अशुभ मुहूर्त असणें. (४) संयोगज दोष :–संयोगापासून उत्पन्न होणारे, पतित (पापी) यांचा संगदोष किंवा समागम होणें. (५) स्पर्शज दोष–स्पर्शापासून उत्पन्न होणारे अस्पर्श वस्तु, पशु किंवा प्राणी यांच्या स्पर्शापासून होणारा दोष. असें वेदान्त व स्मृतींत निरुपण केलें आहे. पण एकदां भक्तिमार्गांत प्रवेश करण्यासाठीं ब्रह्मसंबंधाची दीक्षा घेतली म्हणजे ह्या सर्व दोषांची निवृत्ति होते.

ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोतियः।
लिप्यते न स पापेन पद्मपत्र मिवांभसा ॥ गीता ५–१०॥

" ब्रह्माचे ठायीं अर्पण करून आसक्ति–विरहीत जो कर्में करतो त्याला कमळाच्या पानाला जसें पाणी, त्याप्रमाणें पाप चिकटत (लागत) नाहीं " हीच दोषनिवृत्ति होय. म्हणूनच ' ब्रह्मसंबंधः सर्व दोष निवर्तकः ॥ असें म्हटलें आहे.

मोठ्या कष्टानें व दुःखानें सांगावें लागतें कीं, कांहीं परमार्थांचे अभिमानी लोकांत साधारण प्रपंचांत दिसणारा सभ्यपणा, सौम्यपणा दिसत नाहीं. उलट एकमेकांशीं भांडत सुटतात. द्वेष करतात; व उकाळ्या–पाकाळ्या काढून निंदा करतात. कित्येक तर आपली योग्यता नसतांही सिद्धपणा मिरवितात व उलट विषयलोभांत गुंतून फुकट नाडले जातात. कित्येक तर पुष्कळ ग्रंथ वाचल्यानें कृतार्थ झालों असें समजून शब्दज्ञानाच्या घमेंडीत राहून आपला ( स्वार्थ ) परमार्थ दवडतात. कांहीं तर अणिमागिरिमांच्या जाळ्यांत सांपडून आपला खरा व अविनाशी लाभ घालवितात. अशी एक नि दोन तऱ्हेनें नागवणूक होते. या मार्गानें साधकांस अडथळा करणारीं हजारों विघ्नें आ पसरून आहेत. आणि तीं फक्त ईश्वरानुग्रहानेंच व सद्गुरुप्रसादानें दूर होतात. एरव्हीं स्वबुद्धीबळावर हा भवसागर तरून जाईन म्हटलें तर तें होणें कठीण. याकरतां संतसमागम केला पाहिजे.

सत्संगेन परं प्राप्य दुस्तरं तरतेऽचिरात् ।
तस्मादति प्रयत्नेन सत्संगं सततं कुरु ॥ १ ॥

**अर्थः**—सत्संगानें परमात्म्याची प्राप्ती होते व हा दुस्तर भवसागर तरून जातां येतो. याकरतां मोठ्या प्रयत्नानें सर्वकाळ सत्संग कर.

' संतमाझे ळळेवाड । त्यांची पूजा मजलागे गोड । संत सेवकाचे मी पुरवीं कोड । मज निचाडा चाड संतांची ॥

सांडूनि माझें पूजाध्यान । जो संतांशी घाली लोटांगण । कोटी यज्ञाचें फळ जाण । मदर्पण तेणें केलें ॥ प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ती । संत सचेतन माझ्या मूर्ती ॥ दृढभावें केल्या त्यांची भक्ति । तें मज निश्चितीं पावली ॥ प्रतिमा निजकल्पना उत्तम । संत प्रत्यक्ष पुरुषोत्तम । चालतें बोलतें परब्रह्म । अति उत्तम साधुसेवा ॥

( ए. भा. अ. ११ ओं–११९५ ते ९९ )

जिवाला जीवन देऊन जीवदेशाला आणण्याकरितां संतांनीं आपलें सर्वस्व पणाला लावून अनुभव घेतला, व ' पुढच्यास ठेंच व मागचा शहाणा ' आपणांस शहाणें करण्याकरतां, निजलेल्यांना जागें करण्याकरतां, किंबहुना जगाचा उद्धार करण्याकरतां ग्रंथरूपानें आपणच राहिले आहेत. त्यांचीं बोधवचनें आपणांस मार्ग दाखवितील इतकेंच नव्हे तर कृपेची साऊली, छत्र आपल्या शिरीं सदोदित धरतील. मूल व आई एकमेकांस पाझर फोडतील, आई आपल्या मुलापुरतीच कामधेनु होईल, पण जें वचन सर्वांच्या हृदयाला पाझर फोडितें तो संताचा जिव्हाळा विश्वाची माऊली होय. संताच्या वचनांत जिवींचा जिव्हाळा पूर्ण भरला आहे. जेवढें जेवढें प्याल त्याच्या दुप्पट तो वाढेल. खरी गर्भश्रीमंती ही कीं देऊन सरत नाहीं पण न दिल्यास आटते. अशा तऱ्हेची ही प्रेमवचनें परम आस्तिक्य बुद्धीनें व श्रद्धेनें वाचावीं, ऐकावीं, त्यांचें मनन करावें. शंका येतील त्या ज्ञात्यांस विचाराव्या, आपल्याच मतानें चिखल कालवूं नये, एकाच ग्रंथांत अथवा एकाच्या म्हणण्यांत एकमेकांविरुद्ध कांहीं वचनें आढळतील; त्यावर उगीच कल्पना लढवीत

बसूं नये व कुतर्क काढीत बसूं नयेत. कारण असे कुतर्क काढूनसवरून झाल्यानंतरच ते सिद्धांत लिहिले गेले आहेत हें पक्कें समजावें. आपणास एखादी नवीन कल्पना सुचल्यास त्याबद्दल घमेंड मानूं नये कारण यापूर्वीच ती दुसऱ्या एखाद्याच्या डोक्यांत आलेली आपल्या दृष्टीस पडते. याकरितां आपल्यापेक्षां विद्वानांचा सहवास करावा त्यायोगें आपल्या ज्ञानांत भर पडते व दुष्ट अभिमान चढत नाहीं.

प्राकृत ग्रंथाकडे संस्कृत भाषाभिमानी पहात नाहीं. ते तुच्छ मानतात; पण तें योग्य नाहीं कारण एकेक प्राकृत ग्रंथ असे आहेत कीं, ते संस्कृत ग्रंथालाही आपल्या प्रौढीनें मागें टाकतील. संतांनीं लिहिलेलीं वचनें (ग्रंथ) मग तीं कोणत्याही भाषेंत असो, पंजाबी, गुजराथी, कानडी, तेलगु, द्राविडी, इंग्रजी, इ० तीं सर्व पूज्य मानावींत कारण त्यांत सर्व संतांचा एकच सूर, एकच जिव्हाळा, एकच ध्येय व एकच मार्ग मिळतो. निरनिराळ्या संतांनीं निरनिराळ्या देशांत लिहिलेले ग्रंथ देखील एकमेकांस तंतोतंत मिळतात. वर्णनशैली निराळी असूं शकेल पण तत्त्व मात्र एकच असतें.

मनुष्य हा ईश्वरी अंश आहे; आणि आपल्या भोंवती जें जें आपण पाहतों तें सर्व ईश्वरी ज्ञानाचें कार्य होय. "लोकांचें बरें करशील तर तुझें बरे होईल" यांतील तात्पर्य एवढेंच कीं, तूं विश्व आहेस म्हणजे जगांतील प्रत्येक आत्मा तो तुझाच आत्मा व जगांतील प्रत्येक शरीर तें तुझेंच शरीर आहे. 'चिंती परा तें येई घरा' या म्हणीचा अर्थ यावरून उघड होतो. 'वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः (गीता) "जें जें भेटें भूत। तें तें मानी भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा॥ (ज्ञाने०)

आपल्या देहांत शुद्ध ज्ञानस्वरुपानें असणाऱ्या आत्म्याची ओळख झाली पाहिजे आणि ह्याकरितांच संतांस (ग्रंथांस) शरण गेलें पाहिजे. शिवाजीमहाराजांनीं रामदासस्वामींस आपलें सर्व राज्य अर्पण केलें, स्वामींचा त्यांच्यावर अनुग्रह झाला. जेव्हां ते म्हणाले—"शिवबा, हें राज्य तुला कृपाप्रसाद म्हणून परत देतों; परंतु 'हें राज्य "प्रभूचें" आहे अशी भावना मनांत ठेव व त्याचें स्मरण सदोदित व्हावें म्हणून महाराष्ट्राचा झेंडा भगवा कर. राजा मयूरध्वजाची गोष्ट तर सर्व विश्रुतच आहे. 'भगवान श्रीकृष्ण अर्जुनासहीत राजा मयूरध्वजाकडे साधुवेषांत गेले असतां त्यांनीं राजाचें अर्धें शरीर आपल्या मुलाच्या जीव संरक्षणार्थ वाघाला देण्यास मागितलें. राजानें त्या मागणीचा मोठ्या आनंदानें स्वीकार केला. साक्षात् भगवान साधुवेषानें आपल्या घरीं आले आहेत; हें त्यांनीं अंतर्ज्ञानानें तेव्हांच जाणलें; अशी सुवर्णसंधी परत लाभणार नाहीं असें जाणून लगेच आपल्या पुत्राला व राणीला आपलें अर्धें शरीर कापण्यास आज्ञा केली. चिरतांना राजाच्या डाव्या नेत्रांतून अश्रू आले, त्यानें तर प्रियवस्तु भगवंताला अर्पण केलीच होती, मग हे डोळ्यांत अश्रूं कां आले? अश्रूं आलेले पाहून साधुवेषधारी भगवान् म्हणाले, "तुला जें अर्पण करावयाचें तें तूं प्रसन्न चित्तानें अर्पण केलें पाहिजेस, पण ज्या अर्थी तुझ्या डोळ्यांत अश्रू येत आहेत त्या अर्थी तुला कष्ट होत असले पाहिजेत

म्हणून मला हें असें दुःखी होऊन असंतोषानें दिलेलें नको; तेव्हां राजा मयूरध्वज म्हणाला, 'भगवान्! माझें अर्धें शरीर तर प्रभूसेवेकरतां उपयोगांत आलें पण बाकीच्या अर्ध्या शरीरानें कोणतें पाप केलें कीं, तें प्रभूप्रित्यर्थ उपयोगांत येऊं नये ? मी हें अर्पण दुःखित अंतःकरणानें करीत नसून श्रद्धायुक्त, पूर्ण भक्तिपूर्वकच करीत आहे. परन्तु या माझ्या डाव्या अंगाचा उपयोग प्रभूला होत नाहीं म्हणून डाव्या नेत्रांतून पाणी येत आहे. अर्पणांत असा उत्कट व आत्यंतिक भाव पाहिजे तेव्हांचा प्रभु संतुष्ट होईल आणि तो भाव स्वतःची ओळख पटल्याशिवाय होणें शक्य नाहीं.

जगांतील यच्चयावत् वस्तू प्रभूच्या आहेत. जर आपण बारकाईनें पाहिलें तर आपला कोणत्याही पदार्थावर हक्क नाहीं. पदार्थ मिळण्याकरितां नाना उपाय योजा. खटपटी–लटपटी किती करा. प्रभूकृपेशिवाय सर्व व्यर्थ आहे. ज्याला हें समजलें तो वाटेल त्या संकटाला तोंड देऊन आपल्या मार्गापासून रेसभरसुद्धां च्युत होणार नाहीं, त्याला विकार होत नाहीं. 'हें माझें, तें माझें,' या आसक्त बुद्धीनें नाना तऱ्हेचीं दुःखें ओढून घेण्याला मनुष्याच्या अंगीं असलेला अहंकार व ममत्व हे दुर्गुण होत. या दुर्गुणाला फांटा फक्त संतसमागमनानेंच मिळूं शकेल.

जेथ माझें मज अंतरंग । ओळखूं येईना यथासांग ।।
त्या म्यां संतमनींचे तरंग । वर्णावे निर्व्यंग कैसेनी ।।
करुं जातां स्वरुप निर्धार । मूकावले जेथ वेदही चार ।।
त्या तुझ्या रुपाचा विचार । कळेल साचार मज कैसा ।।

श्रीसाईसत्‌चरित्राचे लेखक कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचेकडून स्वतःचें चरित्र श्रीसाईनीं लिहून घेतलें खरें पण केव्हां ? त्यांच्या चित्ताची शुद्धी झाल्या नंतर. कै. हरि सीताराम दीक्षित उर्फ भाऊसाहेब यांना साईबाबा काका म्हणत व कै. नारायण गोविंद चांदोरकर यांना साईबाबा नाना म्हणत. परोपरीनें सांगत असतां गोविंदराव शिरडीस जाण्यास टंगळमंगळ करीत होते, संकल्प विकल्पानें मन भरल्यामुळें सत्यावर तें जडेंच ना, पण योगायोग आला आणि बळेंच त्यांना शिरडीस जाणें भाग पडलें. नुसता संतदर्शनाचा जाण्याचा संकल्प झाला तों विकल्प १२ वाटे पळाला. श्रीसाईमाऊलीची अगाध करणी त्यांना वांद्रें स्टेशनवरच अनुभवास आली. (अ० २. ओं० १२४ ते १२९)

शिरडीस पोंहोंचल्यावर तात्यासाहेब नूलकर यांनीं त्यांना धूळभेट करविली. दर्शन झालें मात्र तोंच आनंदानें मन भरून गेलें, "कधीं ऐकिली नाहीं देखिली । मूर्ती पाहूनि दृष्टी निवाली । तहानभूक सारी हरपली । तटस्थ ठेलीं इंद्रियें ।। लाधलों साईचा चरणस्पर्श । पावलों जो परमर्श । तोच या जिवाचा परमोत्कर्ष । नूतन आयुष्य तेथूनि ।।

आणि शिरडींत येऊन काय केलें तर पहिल्याच दिवशीं बाळासाहेब भाट्याबरोबर गुरु कशास हवा हा वाद मांडला. स्वतःची स्वतंत्रता बुडवायची आणि दुसऱ्याच्या बुद्धीनें चालावयाचें यांत काय भूषण आहे ?

बुडवून आपुली स्वतंत्रता । ओढूनि घ्यावी कां परतंत्रता । जेथें निजकर्तव्य-दक्षता । काय आवश्यकता गुरुची ॥ १५१ ॥ ज्यानें त्यानें केलें पाहिजे । न करी त्यास गुरुनें काय कीजे । न हालवितां हातपाय जो निजे । तयास दीजे काय कवण ॥ १५२ ॥

दैव थोर कीं कर्तृत्व अशा तऱ्हेचा वाद माजून राहिला व शेवटीं निष्कर्ष कांहीं झाला नाहीं. दोन्हीं बाजू अहंपणाच्या पूर्ण आहारीं गेल्यामुळें पडती बाजू कोणीही घेईनात. शेवटीं दोन तास असे वादाविवादांत गेल्यानंतर तो कसाबसा मिटला व सर्वजण मशिदींत गेले. ही मंडळी मशिदींत येतांच श्रीसाईबाबांनीं काकांस ( दीक्षित ) विचारलें, " काय चाललें होतें वाड्यांत । वाद कशाचा होता मांडत । काय म्हणाले हे ( अण्णासाहेब दाभोळकरांकडे बोट दाखवून ) हेमाडपंत ।" दीक्षितांच्या वाड्यापासून मशिदी-पर्यंत बरेंच अंतर आहे. जवळ जवळ ५ मिनिटें लागतात. हा पहिलाच टोला बसल्या-बरोबर दाभोळकर थंड झाले व मनांतील होत्या नव्हत्या त्या सर्व शंका–कुशंका नाहींशा झाल्या. मन–चित्त शुद्ध झालें आणि मगच त्यांना पुढील मार्ग मिळून साईपदीं दृढ झाले. त्यांना " हेमाडपंत " हें नांव बाबांनींच ठेवलें, व प्रत्येक अध्यायाचे शेवटीं ' भक्त हेमाडपंत विरचिते ' असें म्हटलें आहे.

कृष्ण, परब्रह्माचें रुपडें त्यांना सुद्धां गुरुगृहीं ( सांदिपनी ) राहणें भाग पडलें. अध्यात्मविद्या म्हणजे आपली आपणांस ओळख होण्याची विद्या आणि ती नुसते ग्रंथ वाचून प्राप्त होणें कठीण. भक्तिमार्ग सोपा खरा, तरी तो म्हणजे वस्तऱ्याच्या धारेवर चालण्याइतका सोपा आहे. श्रीसाईबाबांनीं आपल्या कित्यानें आपणांस भागवत धर्माची शिकवण दिली आहे. विठ्ठलाचें सगुण रुपडें म्हणजे ' श्रीसाई. '

दाभोळकरांनीं कै० माधवराव देशपांड्यामार्फत ' सत्चरित्र लिहिण्याची ' परवा-नगी मागितली तेव्हां ते म्हणाले, **" मि तों केवळ भिकारी । फिरतों भिक्षेस दारोद्वारीं । ओली कोरडी भाजी भाकरी । खाऊनी गुजरी काळ मी ।** अरे मी तो भिकारी आहे. चार–दोन तुकडे मागून खाणारा मी तर फकीर आहे. माझें रे कशाला चरित्र लिहितां ? " पण माधवराव देशपांड्यांपुढें बाबांचें कांहीं चालेना. कारण माधव रावांची अर्जुनाप्रमाणें सख्य भक्ति होती; व शेवटीं त्याला अनुमती दिली.

साई पूर्ण आश्वासन देती । म्हणती आपुली संपूर्ण अनुमती । चरित्र स्थिती वर्णावया ॥ १ ॥ तुम्हीं आपुलें कार्य करा । मनीं यत्किंचितही न कचरा । विश्वास पूर्ण मद्वचनीं धरा । निर्धार करा मनाचा ॥ २ ॥ केलिया मल्लीलेचें लेखन । होईल अविद्या-दोष निरसन । भक्तिभावें करितां श्रवण । प्रपंचभान मावळेल ॥ ३ ॥ उठतील श्रवण सागरावरी । भक्तिप्रेमामृताच्या लहरी । बुडिया देतां उपराउपरी । येतील करीं बोधरत्नें ॥ ४ ॥

" मी तो केवळ भिकारी " परमात्मा भिकारीच आहे. ' देसी तेव्हां वेशीं ऐसा असशी उदार ' प्रत्येकाच्या दारीं म्हणजे हृदयांत वास करीत फिरत आहे; आणि त्यांचा निर्वाह ' ओली कोरडी भाजी भाकरी ' म्हणजेच सगुण व निर्गुण भक्ती, पंढरपूरचा विठ्ठल

संतवचनांवर पोसला गेला आहे. देव संतवचनाला भाळला, म्हणून आज अठ्ठाविस युगें विठेवर उभा आहे. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, 'एकनाथ नामदेव तुकाराम' यांच्या वचनावरच तो पोसला गेला आहे आणि त्याच वचनाचा खुराक आज वारकरी दरदिवशीं देत आहेत.

कै० गोविंदरावांना बाबांनीं पहिल्यानदा आपण आपणांस कसें ओळखावें याचाच धडा दिला. मनोजयावांचून परमार्थ काय अगर प्रपंच काय इटला आहे. दुनियेचें राज्य एखादेवेळेस मिळेल पण मनोजय परम दुर्घट, सार्वभौम राजापेक्षां, मनाच्या कक्षांत न जातां उलट त्याला राबवणारे संतच श्रेष्ठ आहेत. "भारतांत, अनंतचि झाले जन्मोनियां मेले। होवोनियां गेले रावरंक"। पण शुक्राचार्य, भीष्म, राजा हरिश्चंद्र, तुलसीदास, मिराबाई, ज्ञानोबा, एकनाथ, तुकाराम, रामदास, शिवाजी राजे व अलिकडील सद्गुरु साईनाथ यांच्यासारख्या थोर विभूति-भारताचीं भव्य अभंग रत्नें फारच विरळा.

प्रल्हादानें बापास चित्तांतला असुरभाव आधीं काढून टाकण्यास सांगितलें कारण तोच तुमचा शत्रू आहे, "समं मनोधत्स्व न सन्ति विद्विषः" म्हणजे मन साम्य स्थितींत ठेवा, उच्छृंखल व कुमार्गाकडे सहज धांवणाऱ्या मनापेक्षां दुसरा प्रबळ शत्रु कोणी नाहीं. मनाची समता राखणें हीच अनंताची म्हणजे 'साईची' महापूजा आहे.

संसार मनकल्पित आहे. आपल्या सुखदुःखाला कारण दुसरे तिसरे कोणी नाहींत, देवता नाहींत तर केवळ मन आहे. मन कोणाचे अंकीत नाहीं. तें रोडावत नाहीं. त्याला पकडायला त्याचें स्थान सांपडत नाहीं अशा दुर्जय मनाला लगाम घालून त्यावर स्वार होईल तोच खरा पुरुष.

मग मन वश व्हावें कसें ? 'जेविं हिरेंनि हिरा चिरिजे। तेवीं मनेंचि मन धरिजे॥ (नाथ) मन चंचल व दुर्निग्रह आहे असें अर्जुन म्हणाला तेव्हां 'अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यतां। असें भगवंतानीं स्वतः सांगितलें आहे.

कृतयुगांत 'शमदम' सांगितलें आहे. त्रेतीं 'यजन' द्वापारीं 'पूजन' आणि कलियुगीं मात्र नामकथाकीर्तन हीं साधनें सांगितलीं आहेत. आणि बाबांनीं हेंच सांगितलें आहे. अण्णा चिंचणीकरांनीं विचारलें, बाबा दाभोळकर आतां पेन्शनर आहेत त्यांचा संसार त्यांच्या पाठीशीं आहे. त्यावर बाबांनीं हेंच सांगितलें-' मिळेल मेली तयास नोकरी। करावी आतां माझी चाकरी। सुखसंसारीं लाधेल। ३-७६ ताटें याची भरलीं सदा। यवज्जीव नरितीं कदा। भावें मत्सर होतां सर्वदा। हरलीव आपदा तयाच्या॥ ७७॥ लाग्या-बांध्यावीण विशेषीं। कोणी न येई आपुले पाशीं। श्वान सूकर कां माशी। हड हड कुणाशी करूं नये॥ ८१॥ यानें आतां माझीच सेवा करावी. मी सर्वभूतीं आहे. अशी भावना मनांत दृढ बाळगावी म्हणजे स्वतःची ओळख होईल.

मनबुध्यादि इंद्रियांसकट। नव्हे मी स्थूल नव्हे विराट। नव्हे हिरण्यगर्भ अप्रकट। साक्षी मी जुनाट अनादी॥ ९१॥ एवंगुण इंद्रियां परता। नाहीं मज विषयतत्परता। नाहीं मजवीण ठाव रिता। कर्ताकरविता मी नव्हे॥ ९२॥ मनबुध्यादि इंद्रियगण। अवघा

जडही जेथें ओळखण तेथेंच ' विरक्ति ' प्रकटेल जाण । सारील आवरण ज्ञानाचें ।।९३ ।। स्वरूपाचें जें विस्मरण । तेंच मायेचें अवतरण । शुद्ध पूर्णानंद स्मरण । तोच मी चैतन्यघनरूप ।। ९४ ।। त्यामजकडे चिरविणें वृत्ती । तीच सेवा तीच मद्भक्ति । चिदानंद मी होतां प्रतीती । शुद्ध स्थिती तें ज्ञान ।। ९५ ।। अयामात्मा ब्रह्म । प्रज्ञानमानंद ब्रह्म । जगन्मिथ्यत्वें जगद्भ्रम । सत्यत्वें ब्रह्म तो हा मी ।। ९६ ।। नित्य शुद्ध बुद्ध मुक्त । वासुदेवोऽहमोमाश्रित्त । सत्य श्रद्धाभक्तिसहित । पूजन स्वहित हें माझें ।। ९७ ।। ऐसें मी कोण तें समजून । करावें माझें यथार्थ पूजन । वरी व्हावें अनन्य शरण । जावें समरसून मजमाजीं ।। ९७ ।।

मूळचे आपण परमात्मरूपच आहोंत हें समजण्यास परमात्म्याची कृपा पाहिजे. अर्थात् आपलीच कृपा आपल्यावर होईल तेव्हांच आत्मबोध होईल. ' ऐसे मी कोण तें समजून ' परक्याची कृपा आपला बोध आपल्याला कसा करून देईल ? सत् आणि गुरु म्हणजे श्रेष्ठ असें जें पद तें सद्गुरुपद होय. अशास्वत असलेल्या त्या नश्वर जगांत सत् आणि श्रेष्ठ एकच आहे. आणि तें म्हणजे परमात्मपद होय. त्यावांचून इतर पदें पदव्या व्यर्थ होत. परमात्मपद बोधरूप आहे; अर्थात् आपण परमात्मपदरूप आहोंत हा बोध होणें याचेंच नांव सद्गुरुकृपा. आणि ती " मनसस्तुपरबुद्धीः " ( गीता ३–४२ ) अशा शुद्ध बुद्धीचाच विषय आहे. आणि सद्बुद्धीनेंच परमात्म्याशीं अनन्य होतां येतें हाच बुद्धियोग, ' बुद्धीयोगमुपाश्रित्य ' झाल्याशिवाय आत्मलाभ होणें शक्य नाहीं.

शेवटीं परमात्मा ' साई ' वृत्तिरहित अशा अखंड स्मरणीनें कधीं स्मरला जाईल ? हृदयाकाशांत तो बोधानें प्रगट होऊन ठाण मांडून उभा राहिल्यावर हृदयांत प्रगट कधीं होईल ? श्रीगुरुकरुणोदयाकाळीं, श्रीगुरूला करुणा कधीं येईल ? शरणांगति गेल्यावर शरणांगति कशानें होईल ? संतसमागमानें, संतसमागम कधीं घडेल ? परमात्मप्राप्तीसाठीं अंतःकरणांत तळमळ लागून मुमुक्षुत्व प्राप्त होईल तेव्हां. मुमुक्षुत्व कधीं प्राप्त होईल ? मी कोण, आलों कोठून, जाणार कोठें हें समजून घेण्याची ज्याला तळमळ लागेल तो लवकर मुमुक्षु होईल.

" सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी ( दा० बोध ६–१० )

सद्गुरूकृपा सद्गुरुच्या ठिकाणीं आहे आणि तें सद्गुरुपद हृदयांत आहे; ' मज हृदयीं सद्गुरु तेणें तारिलें संसारपुरु ( ज्ञा० १–२२ ) तें बाहेर प्रगट करण्याकरितांच, सत्संगती, संतसेवा व संतकृपा ही होय.

मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे । आणि हृदयीं स्वयंभाचि असे । प्रत्यक्ष फावेंऽलागे तैसें । आपसयाचि ( ज्ञा० ९–४९ )

अर्थात् आपली ओळख हीच साईची ओळख आणि त्याकरतांच भक्ति.

संपादक

# —: गुप्त महामंत्र :—

एक श्रद्धाळू भक्त दररोज गांवाच्या बाहेर एका साधुपुरुषाकडे जात असे. त्या साधुपुरुषाची सेवा करतां करतां बरेच दिवस निघून गेले. नंतर त्या सत्पुरुषानें त्याला योग्य इसम समजून म्हटलें, "मुला तुझी बुद्धी परमेश्वराचे ठिकाणीं आहे. तूं श्रद्धाळू आहेस. शास्त्रवचनांवर तुझा विश्वास आहे. तूं दुसऱ्याचें वाईट चिंतीत नाहींस, कोणाचा द्वेष करीत नाहींस. सरळ मनाचा आहेस. काम, क्रोध, लोभ यांना भिऊन वागतोस. संतांची उपासना करतोस व जिज्ञासू आहेस. याकरतां मी तुला असा एक गुप्त मंत्र देतों कीं, त्याची माहिती फारच थोड्या लोकांस आहे. हा मंत्र फारच गुप्त व अमूल्य असा आहे. कोणाला सांगूं नकोस" असें सांगून त्या सत्पुरुषानें त्याच्या कानांत हळूच 'राम' असें म्हटलें. श्रद्धाळू भक्त त्या 'राम' या राजमंत्राचा जप करूं लागला. तो एक दिवस गंगेवर स्नान करून परत येत असतां त्याचें लक्ष त्याच्याचप्रमाणें गंगेचें स्नान करून तोंडानें 'रामराम' म्हणत परत चाललेल्या त्या हजारों लोकांच्या जनसमुदायाकडे गेलें. नेहमींच तो तें नांव ऐकत होता. परंतु तिकडे अद्यापपर्यंत त्याचें इतकें लक्ष गेलें नव्हतें. आज लक्ष गेल्याबरोबर त्याचे मनांत विचार आला कीं, आपल्या गुरुजींनीं हा राममंत्र अतिशय गुप्त आहे म्हणून सांगितलें आणि कोणाला सांगूं नकोस म्हणून बजावलें परंतु तो तर सर्व लोकांस माहीत आहे. हजारों मनुष्य 'राम राम' करीत चाललेले आहेत. त्याच्या मनांत थोडासा संशय उत्पन्न झाला. तो आपल्या घरीं न जातां तडक तसाच आपल्या गुरूच्या घरीं गेला. गुरूनें म्हटलें 'मुला, आज यावेळीं कसा आलास' त्यानें आपला संशय प्रगट करून म्हटलें, "महाराज, माझ्या समजुतींत कांहीं घोटाळा आहे कीं याचा दुसरा कांहीं अर्थ आहे ? आपल्या दिव्य वाणीनें माझा हा संशय दूर करण्याची कृपा करावी" सत्पुरुषानें त्याच्या मनांतील हेतू जाणला व म्हटलें, 'मित्रा,' तुझ्या प्रश्नाचें उत्तर मागाहून देईन. त्याच्यापूर्वीं तूं माझें एक काम कर. सत्पुरुषानें आपल्या झोळींतून एक चमकणारी कांचेसारखी गोळी काढली व ती भक्ताचे हातांत देऊन म्हटलें, 'बाजारांत जाऊन याची काय किंमत येईल तें विचारून ये. विकावयाचें नाहीं. फक्त काय किंमत येईल तें विचारायचें, मात्र सावध रहा कीं, किंमत करण्यामध्यें कांहीं चूक मात्र होऊं देऊं नको.' भक्त श्रद्धाळू होता. आजकालचा असता तर त्यानें पहिल्यानेंच गुरूची खरडपट्टी काढली असती व म्हटलें असतें कीं, 'मी तुमच्या कांचेच्या तुकड्याची किंमत करण्याकरितां आलों नाहीं. तुमचा कांहीं नोकर नाहीं. पहिल्यानें माझ्या प्रश्नाचें उत्तर द्या. नाहींतर माझ्याशीं कपट केल्याबद्दल तुमच्यावर कोर्टांत फिर्याद करतों' तो काळ निराळा होता. भक्त आपली शंका तशीच टाकून गुरूचें काम करण्याकरितां बाजारांत गेला. सर्वांत प्रथम त्याला एक भाजीवाली भेटली. भक्तानें गुरुजींनीं दिलेली वस्तु तिला दाखवून विचारलें, याची काय किंमत देशील ? भाजीवालीनें त्या दगडाची चमक व सौंदर्य पाहून मनाशीं विचार केला, मुलांना खेळावयास सुंदर गोळी होईल, बाजारांत

अशी मिळणार नाहीं. ती म्हणाली एक–दोन शेर बटाटे किंवा वांगीं देईन. तो पुढें गेला. एक सोनाराचें दुकान होतें तेथें थांबला; व त्या सोनारास गोळी दाखवून म्हणाला, " दादा, याची काय किंमत देशील ? " सोनारानें हातांत घेऊन पाहिलें व नकली हिरा समजून शंभर रुपये देऊं केले. भक्ताचीहि उत्कंठा वाढली. तो पुढें एका सावकाराकडे गेला. सावकारानें गोळी पाहून विचार केला, ' इतका मोठा व उत्तम हिरा जगांत कोठून असणार. आहे नकली हिरा परन्तु हिऱ्यासारखा दिसतो. मोठ्याघरीं नकली मालच असली समजला जातो. त्यानें एक हजार रुपये देऊं केले. भक्तानें विचार केला कांहींतरी मौल्यवान वस्तू आहे हें नक्कीच. तो पुढें एका जवाहिऱ्याचे दुकानांत गेला. जवाहिऱ्यानें परीक्षा करून तो हिरा ठरविला. परंतु इतका मोठा व अशा तऱ्हेचा हिरा त्यानें कधीं पाहिला नव्हता. म्हणून त्यास थोडी शंका आली. तरी त्यानें एक लाख रुपये देण्याचें कबूल केलें. भक्तानें ' विकवयाचा नाहीं ' असें सांगून एका अतिशय प्रख्यात अशा जवाहिऱ्याचे दुकानीं गेला. ज्यावेळीं तो गुरूचे येथून निघाला होता त्यावेळीं जवाहिऱ्याचे पाशीं जाण्याचें धाडस झालें नव्हतें. तो स्वतःच त्याला गुजबी कांच समजत होता. परंतु जसजशी किंमत वाढत चालली तसतसें त्याचें धैर्यही वाढत चाललें. प्रख्यात जवाहिऱ्यानें हिरा पाहून सांगितलें, " भल्या गृहस्था, हा तर अमूल्य असा हिरा आहे. या देशांतील सर्व जडजवाहीर जरी याचें मोबदल्यांत देऊं केलें तरी ह्याची किंमत होणार नाहीं. हें विकूं नको. " हें ऐकून भक्तानें विचार केला कीं, आतां तर शेवटच झाला.

तो परत गुरुजीकडे गेला व म्हणाला, ' महाराज याची किंमत कोणीच करूं शकत नाहीं. ही एक अमूल्य वस्तु आहे. ' गुरुजींनें विचारलें, ' तुला हें कोणी सांगितलें ? " भक्त म्हणाला, ' महाराज, मी येथून बाजारांत गेलों व तेथें पहिल्यानें एका भाजीवालीला विचारलें तेव्हां तिनें एक–दोन शेर भाजी देऊं केली. सोनारानें शंभर रुपये देऊं केले. सावकारानें हजार. जवाहिऱ्यानें एक लाख व सर्वांत शेवटीं मोठ्या जवाहिऱ्यानें त्यास अमूल्य ठरवून सांगितलें कीं, देशांतील सर्व जडजवाहीर जरी याचे बदली देऊं केलें तरी याची किंमत भरणार नाहीं " गुरूनें तें रत्न त्याचेजवळून घेतलें व आपल्या झोळींत ठेवून दिलें. भक्त म्हणाला, " महाराज, आतां माझी शंका दूर करा.' गुरुजी म्हणाले, ' मुला मी तुझी शंका दृष्टांत देऊन दूर केली व उपदेशही केला पण तुला समजली नाहीं म्हणून परत फोड करून सांगतों. या रत्नाची किंमत करण्यामध्येंच तुझी शंका दूर व्हावयास पाहिजे होती. रत्न अमूल्य होतें परंतु त्याची खरी किंमत मात्र मोठ्यांत मोठ्या जवाहिऱ्याला झाली व दुसरा कोणी ओळखूं शकला नाहीं. जर अमूल्य वस्तू कवडी किंमतीला विकली गेली असती तर केवढें नुकसान झालें असतें ? याचप्रमाणें श्रीराम नाम देखील गुप्त व अमूल्य वस्तू आहे याची ओळख सर्वांना नाहीं व त्याची किंमत देखील सर्वच जाणतात असें नाहीं. वस्तू हातांत असून देखीच जोंपर्यंत त्याची पूर्ण पारख होत नाहीं तोंपर्यंत त्यांतील सत्यता दूरच रहते. त्याचप्रमाणें रामनामाचें खरें महत्त्व फारच थोडे लोक जाणतात. जे रामनामाचा व्यवहार करतात त्यांची खरो-खरच कींव केली पाहिजे कारण ते हें अमूल्य रामरूपि धन कवडी किंमतीला विकत असतात.

यामुळें अत्यंत मौल्यवान रत्न दोन शेर भाजीच्या मोबदल्यांत विकणाऱ्या मूर्खांप्रमाणें ते नेहमींच भक्ती व प्रेमाचे बाबतींत दरिद्रीच रहातात. भक्ती व प्रेम असल्याशिवाय परमात्मा मिळत नाहीं आणि परमात्मा मिळाल्याशिवाय दुःखापासून सुटका होणें शक्य नाहीं. दुःखाचा शेवट परमात्मा प्राप्त करून घेण्यामध्येंच आहे; आणि त्या परमात्म्याच्या प्राप्तीचें मुख्य साधन म्हणजे 'परमेश्वराचें नामस्मरण' होय. याकरितां परमेश्वराचे नामस्मरणाचा दुसऱ्या कशाचेही कामीं उपयोग करतां कामा नये. परमेश्वराचें नामस्मरण फक्त परमेश्वराकरतांच केलें पाहिजे–परमेश्वराकरितां नव्हे तर त्याच्या प्रेमाकरतां–प्रेमाकरितांही नव्हे–परन्तु केवळ तें घेतल्याशिवाय रहावत नाहीं. म्हणून मनाची प्रवृत्तीच अशी बनली पाहिजे कीं, नामस्मरणाखेरीज क्षणभरदेखील चैनच पडतां कामा नये. जसा श्वास रोधल्याबरोबर घसा दाटून येतो. प्राण व्याकूळ होऊन उठतो त्याप्रमाणें नामस्मरणांत थोडी जरी चूक झाली, क्षणभरजरी विलंब झाला तर तडफडावयास लागलें पाहिजे."

व. तु. ठाकूर
(धर्मयुगावरून)

---

# साई–प्रभाव

## —: श्रीसद्गुरु साईनाथ सुप्रसन्न :—

ठाणें
बलिप्रतिपदा
ता. ३१–१०–५१

श्री. डॉ. गव्हाणकर महाशय,

संपादक श्रीसाईलीला यांसी सप्रेम प्रणाम. वि. वि.

बरेच दिवसांत मी आपणांकडे कांहीं लिहिलें नाहीं. माझ्या मनांत पुष्कळ वेळां पुष्कळ विचार येतात पण काय असेल तें असो, ते विचार हल्लीं माझ्याकडून लिहिले जात नाहींत. मी शिर्डी येथें असतांनासुद्धां जी भक्तमंडळी येतात त्यांना सुद्धां मी विचारतों कीं, शिर्डीला यावयास तुम्हांला कांहीं अनुभव आला का? व ती मंडळीसुद्धां अत्यंत प्रेमभावानें आपापली हकीकत सांगतात; पण ती सर्व कांहीं लक्षांत रहात नाहीं. अगर दरवेळेस लिहून घ्यावयास वेळ असतोच असें नाहीं. परंतु मी त्यांना आग्रहानें सांगतों कीं, हे आपले अनुभव–ह्या सर्व महाराजांच्या लीला, आपण जरूर श्रीसाईलीलेकडे पाठवा. तेव्हां या सर्व गोष्टींना प्रत्यक्षांत सुरवात करावी म्हणून, आजचा सुमुहूर्त पाहून परवांच कळलेले कांहीं अनुभव आपणांकडे लिहून पाठवीत आहे. बघूं या बाबांची काय इच्छा आहे ती!

अलिकडे मी असें पाहतों कीं, आपल्या महाराजांच्या कीर्तीचा डिंडिमा सगळीकडे जोरानें गर्जू लागला आहे. त्याला ठाणें कांहीं अपवाद नाहीं. ठाणें येथें श्री. काका प्रधान–एक सेवानिवृत्त शाळामास्तर–यांच्या घरीं दर गुरुवारीं १००–१२५ मंडळी महाराजांच्या आरतीला जमतात. येथील साईभक्तांत दोन विशिष्ट व्यक्तींची जास्त वहावा आहे; व त्या व्यक्ती म्हणजे एक गोवेंकरबाबा व एक देवबाबा. देवबाबा म्हणजे श्री. ए. आर्. वालावलकर–कै. अण्णासाहेब दाभोळकर, श्रीसाईसच्चरित कर्ते–यांचे नातू व ज्यांच्याविषयीं उल्लेख ' Shri Sai Baba of Shirdi, a Glimpse of Indian Spirituality by late Moreshwar Pradhan. ह्या पुस्तकांत दुसऱ्या आवृत्तीच्या ९–१०–४३ च्या लेखकांच्या प्रस्तावनेंत आलेला आहे. श्री. काका प्रधान हे ह्या देवबाबांना माझ्याकडे दि. २५–१०–५१ ला पहांटे ५ वाजतां घेऊन आले. त्यांच्याबरोबर त्यांची चहाती ४–५ मंडळीही होती व त्यांच्या बोलण्यावरून मला असें कळलें कीं, ही सर्व मंडळी आदल्या दिवशीं रात्रभर जागतच होती. व अशीच निरनिराळया भक्तांच्याकडे जाऊन बाबांच्याविषयीं गप्पा मारीत त्यांनीं ती सबंध रात्र काढली. देवबाबांच्या सांगण्यांत आलेल्या गोष्टी खालील प्रमाणें:—

ते त्यांच्या मावशी श्री. गोळवलकर (श्री. कै. यशवंतराव गाळवणकर, माजी विश्वस्त. शिरडीसंस्थान) यांच्या घरीं वांद्रें येथें रहात असतांना, त्यांना एकदां बाबांनीं स्वप्नांत शिर्डी येथें श्री. यशवंतरावांचा जुना कोट घालून येण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यांनीं मावशींना सांगितलें व श्री. यशवंतरावांचा एक जुना कोट घेतला. मावशींनीं सांगितलें कीं, थोडेसे पैसे बरोबर घेऊन जा व प्रेमानें ५ रुपये दिले. पण ५ रुपयांत शिर्डीची जाऊन येण्याची यात्रा कशी होणार! बाबांनीं आपणाला आज्ञा केली आहे तेव्हां त्यांच्यावर सारी भिस्त ठेवून हे देवबाबा शिरडीला जाण्यास निघाले; अंगावर फक्त एक जुना कोट व धोतर असा वेष होता. बोरीबंदर स्टेशनवर ते आले व सहज कोटांत हात घालून पाहिला तर दहा रुपयांची एक नोट सांपडली. मनाला आनंद झाला व गुरुरायाच्या लीलेचें कौतुक वाटलें. कोपरगांवाचें तिकीट काढून ते ते शिरडीला आले व गुरुरायांचें त्यांच्या आज्ञेप्रमाणें दर्शन घेतलें. तेथून कोल्हापूरला जाण्याची आज्ञा झाली; म्हणून तिकडे निघाले. ते कर्जत स्टेशनपर्यंत आले. कर्जतला मद्रास मेलला गर्दी फार. मेलची तिकिटें देण्याचें बंद केल्याचें सांगण्यांत आलें तेव्हां त्यांनीं स्टेशनमास्तरपाशीं जाऊन इंग्रजींत बोलण्यास सुरवात केली. स्टेशनमास्तरना जणूं कांहीं अगोदरच पंढरपूरच्या विठोबारायांची तार आली होती अशा जाणिवेनें, स्टेशन-मास्तरांनीं या देवबाबांची त्या मेलगाडींत सोय करून देण्याचें कबूल केलें. गाडी आली. गाडींत गर्दी फार! स्टेशनमास्तरांनी गार्डास सांगितलें. देवबाबांचा एकंदर फकिरी वेष पाहून गार्डानें सांगितलें कीं, "ठीक आहे" व त्यांना स्वतःच्याच डब्यांत बसवून घेतलें. कुर्डुवाडीस देवबाबा उतरून गार्डास पैसे देऊं लागले तर त्यांनीं मोठ्या नम्रपणें नकार दिला. येवढेंच नव्हें तर पंढरपूरला जाणाऱ्या गाडीच्या गार्डालाही "हा माझा माणूस आहे यास पंढरपुरापर्यंत घेऊन जा" असें सांगितलें. अशा रीतीनें पंढरपूरची यात्रा

विनासायास व विनामूल्य घडविली. पंढरपुरास रुक्मिणी पांडुरंगाचें मनोहर दर्शन घेऊन हे देवबाबा परत निघाले. तेथून ते भिवपुरीला आले व तेथें फकिराच्या वेषांत त्यांना श्रीसाईबाबाचें दर्शन झालें व ते तेथें रात्रीं निजले असतांना पहांटेच्या सुमारास आंतून कडी लावलेली असतांना देखील श्रीबाबा देवळांत आले व कांकडआरतीच्या सुमारास तेथें येऊन राहिले. नंतर बाबांच्या आज्ञेप्रमाणें श्री. वालावलकर यांनीं मुंबईहून एक चांगली हनुमंताची मूर्ति आणून त्याची योग्य मुहूर्तावर भिवपुरी येथें स्थापना केली आहे.

(२)

मी, आमची चुलतबहीण ती. सौ. सत्यभामाबाई उर्फ माई खांडेकर यांचेकडे दादरला मध्यंतरीं गेलों असतांना तिनें नुकतीच घडलेली हकीकत सांगितली. आतां नुकताच जो पुण्यतिथीचा उत्सव शिर्डीस झाला, त्यावेळेला तिच्याच चाळींत राहणारे एक कुटुंब शिरडीला गेलें होतें. त्यांच्याबरोबर एक २–३ वर्षांची त्यांची मुलगी होती. त्यांना समाधीमंदिराशेजारील एका चाळींत खोली मिळाली. मध्यंतरी मुलें खेळत असतांना, ही वरील मुलगी वरून खालीं पडली. मुलगी पडली असें कळल्यानंतर तिच्या आईनें हंबरडाच फोडला; तिला वाटलें कीं आपली मुलगी आतां जिवंत कांहीं आपल्या दृष्टीस पडणार नाहीं; पण धांवत धांवत मंडळी खालीं येऊन पहातात तों मुलगी चांगली धांवते आहे व खेळते आहे. आपणां सर्वांनीं माहितच आहे कीं, सभामंडपानंतरच्या खुल्या जागेंत संपूर्ण लादी बसविली आहे, व या लादीवर इतक्या उंचावरून पडूनसुद्धां तिला कांहीं लागलें नाहीं. हें केवढें आश्चर्य! अर्थात् मुलीला खेळतांना पाहिल्यावर तिच्या सर्व मंडळींना अत्यंत आनंद झाला. नंतर त्यांनीं मुलीला विचारलें व तिचें उत्तर ऐकलें त्यावेळेस तर त्या सर्वांना अतिशयच आश्चर्य वाटलें व बाबांच्या प्रेमाचे आणि लीलेचें कौतुक वाटून सर्वांच्या डोळ्यांतून घळाघळां प्रेमाश्रू व आनंदाश्रू आले. मुलीला आईनें विचारलें कीं, "बाळ, तूं इतक्या वरून पडलीस. तुला लागलं नाहीं काय?" ती म्हणाली "नाहीं. मी जशी पडावयाला लागलें तसें बाबांनीं मला अलगद झेलली." लोकांनीं विचारलें कीं, "बाबा कसे होते?" तिनें उत्तर दिलें कीं, "फोटोमध्यें आहेत तसे" यापेक्षां बाबांच्या वास्तव्याची निराळी कांहीं साक्ष हवी का? उगाच भक्त लोक इतका सुखाचा ठेवा आपल्या हाताशीं असतांनां दुसरीकडे वणवण भटकतात हें समजत नाहीं. दुर्दैव त्यांचें!!

(३)

मागें एकदां मी शिरडीला आपल्या कमिटी हॉलमध्यें उतरलों होतों. तेथें कर्नल समर्थांचे बंधू आले होते व त्यांच्याबरोबर कर्नल समर्थांची एक मनोहर धाकटी मुलगी आली होती. तिचे आईवडील मागून येणार होते. पण ती माझ्या समजुतीप्रमाणें रेडिओस्टार श्री. पांडुरंगराव दीक्षित, श्री. विनोदीनीबाई दीक्षित व प्रमोदिनीबाई दीक्षित यांच्याबरोबर आली होती. ही मंडळी सहज त्या हॉलमध्यें आली होती; व वरील लहान मुलगी आपल्या नादांत नाच करीत होती. ती नाच खरोखरच फार सुंदर व तालांत करीत होती.

नाच झाल्यावर त्या सर्वांना म्हणते कीं " हे येथें फोटोंत बाबा आहेत ना, ते माझ्याकडे माझा नाच पाहून हंसत होते." त्या बालकाच्या तोंडचे ते अत्यंत सहज आलेले उद्गार ऐकून आम्हांस फार आनंद वाटला व बाबांच्या अस्तित्वाची जाणीव झाली. इतक्या पदोपदीं अशा रीतीनें महाराज जाणिवेचे चटके देत असतांनासुद्धां आपण आपल्या अज्ञानाच्या झोपेंतून जागें होत नाहीं हा दैवदुर्विलास नव्हे तर दुसरें काय ?

( ४ )

परवां नोव्हेंबर महिन्यांत नगरजिल्हा न्यायाधीश श्री. उग्रणकर हे शिर्डीला संस्थानचे हिशेब तपासणीस व व्यवस्था पहाण्यास आले होते; व त्यांना संस्थानच्या येत्या निवडणुकीसंबंधीं नियम पहावयाचे होते म्हणून माझें सहज शिर्डीला जाणें घडलें. तेथें एक पारशी गृहस्थ भेटले. त्यांचें नांव विसरलों. ते त्यांच्या वरिष्ठाला घेऊन आले होते. त्यांच्या सांगण्यांत आलें कीं, त्यांचा ८–९ वर्षांचा लहान मुलगा आहे. तो कांहीं वडिलांचें ऐकत नव्हता. वडिलांनीं सांगितलें कीं, 'तूं ऐकत नाहींस तर मी बाबांनाच सांगेन. असें सांगितल्यावर, एक दिवस ते बघतात तों त्यांचा मुलगा अत्यंत प्रेमानें वडिलांच्या जवळ यऊन बसला व म्हणाला कीं, 'आजपासून मी तुम्हीं सांगाल तसें ऐकत जाईन. मी इतके दिवस जरा हुडपणें वागलों त्याची मला क्षमा करा.' तेव्हां वडिलांनीं विचारलें, 'अरे हा फरक तुझ्यांत कसा घडून आला ?" तो म्हणाला कीं, " बाबा काल माझ्या स्वप्नांत आले होते. त्यांनीं मला त्यांच्या मिठींत घट्ट आंवळून घरलें, प्रेमानें गोंजारलें व मला सांगितलें कीं, " बाळ, तूं हुडपणा करतोस तें चांगलें नाहीं. तूं तुझ्या आईवडिलांच्या सांगण्याप्रमाणें वागलें पाहिजे. ते जे सांगतात ते बरोबर आहे." केवढा हा भक्तांविषयीं कळवळा.

( ५ )

१९१३ ते १९१७ पर्यंत आमचे परमपूज्य वडील कै. बाळासाहेब देव हे चिखली जि. सुरत येथें मामलेदार होते. आमच्या वडिलांना महाराजांचें दर्शन १९१० सालीं भक्तश्रेष्ठ कै. नानासाहेब चांदोरकर यांच्यामुळें घडलें; आमचा एक धाकटा गोंडस श्रीविलास नांवाचा भाऊ होता. ( हा १९२० सालीं टायफॉईडनें वारला ) चिखलीला आम्हीं भावंडें खेळत असतांना तो माझ्याशीं भांडला. मी त्याला सहज म्हटलें कीं " तूं माझ्याशीं भांडूं नकोस, नाहींतर मी बाबांना सांगेन." पुढें कांहीं दिवसांनीं आम्हां सर्वांचा शिरडीला जाण्याचा योग आला. तेथें श्री बाबांनीं श्रीविलासला सांगितलें कीं, " बाबूरावांशीं भांडूं नकोस " व ही गोष्ट त्यानें आमच्या कै. ती. गं. भा. आत्याबाई यांना सांगितली. कुठें चिखली, कुठें शिरडी व कुठें आमच्या घरीं घडलेला एक साधासा प्रसंग. पण त्या साध्या प्रसंगाचीसुद्धां कळकळीची जाणीव व काळजी बाबांना !

( ६ )

डॉक्टर, अशा रीतीनें बाबा आपल्या भक्तांविषयीं क्षणोक्षणीं काळजी अजून घेत आहेत. बाबांना लहान मुलें फार आवडत असत; व ते त्यांच्याशीं फार खेळत असत

व वरील गोष्टींवरून ते अजूनही बालकांशीं बोलतात; हंसतात व त्यांची जरूर तेथ काळजी घेतात, याची खात्री होईल. मी परवांच्या दिवशीं म्हणजे शनिवार ता. २२-१२-५१ ला ठाण्याहून शिरडीला व्यवस्थापक समितीच्या आजच्या सभेला उपस्थित रहाण्याच्या उद्देशानें निघालों. ह्या वेळेला ठाण्याच्याच स्टेशनवर नागपूर एक्स्प्रेस गांठण्यासाठीं आलों. तो योगायोगानें रा. अनंतराव आंग्रे हे भेटले. गाडींत गर्दी फार. तसेंच आम्ही दोघे एका डब्यांत घुसलों. जवळजवळ सबंध डब्यांतील माणसें शिरडीलाच जाणारीं होतीं. रा. पाटकर भेटले. बाबांच्या गप्पागोष्टी करीत करीत येत होतों. गाडी कांहीं कारणामुळें कसाऱ्याला पडून राहिली; व मनमाडला ५ वाजतां येऊन पोहोंचली. पुढील कोपरगांवची गाडी अगोदरच निघून गेली म्हणून मनमाडहून निघणाऱ्या बसकरतां गेलों. तेथें मोठी थोरली रांग. जेमतेम ७ च्या बसचीं तिकिटें मिळालीं. बसमध्यें शेजारींच बसलेले एक गुजराथी गृहस्थ यांना शिरडीला कसें यावयास लागलांत असें विचारलें. ह्या गृहस्थाचें नांव रा. चोकसी. हे शेअर बाजारांत दलालीचें काम करतात. ते सहकुटुंब सहपरिवार शिरडीला चाललेले होते. त्यांनीं पुष्कळच बाबांच्या लीलेच्या गोष्टी सांगितल्या परन्तु खालील एक गोष्ट माझ्या चांगली लक्षांत राहिली तेवढी देऊन यावेळेचा हा लेख संपवितों.

एकदां १९४२ च्या धामधुमींत एक बाबांचे भक्त मुंबईहून सुरतला जावयास निघाले. गाडीचीं तिकिटें मिळण्यास फार गर्दी. काय करावें हा विचार या भक्ताचे मनांत आला. इतक्यांत एक पठाण आला व तो म्हणाला कीं, त्याचेजवळ दोन सुरतेचीं तिकिटें आहेत व एक त्याला नको आहे. लगेच पैसे देऊन तें तिकीट या गृहस्थानें घेतलें. पुढें गाडींत गर्दी फार. जागा कुठें नाहीं. पुन्हां तो पठाण आला व म्हणाला कीं, "माझ्या शेजारीं जागा आहे तेथें बसा." हा गृहस्थ तेथें बसला. गाडी चालू झाली, कांहीं वेळानें पठाण व हा गृहस्थ यांच्या दरम्यान जे दोघे प्रवासी होते ते उतरून गेले. पठाण यांना म्हणाला कीं, "तुमचें सामान माझ्याजवळ द्या व तुम्हीं स्वस्थ निजा. त्यावेळीं या गृहस्थांना संशय आला कीं, हा कोणीतरी भामटा दिसतो. तो माझ्यावरती पाळत ठेवून मला लुबाडण्याचा याचा विचार दिसतोय. दोघे एकमेकांकडे पहात राहिले. या गृहस्थाला झोंप लागेना. अशा रीतीनें जागत जागत सुरत स्टेशन आलें. स्टेशनवर त्या गृहस्थाचें सगळें सामान त्या पठाणानें उतरून दिलें. हे गृहस्थही उतरले व उतरतां उतरतां एक शब्द पठाणाच्या तोंडून ऐकूं आला व तो म्हणजे, 'बाबा' व एवढा शब्द बोलून तो पठाण जो अदृश्य झाला तो झालाच. ह्या गृहस्थांनीं त्याचा पुष्कळ शोध केला पण त्याचा पत्ता लागला नाहीं व मागून अत्यंत हळहळ वाटली, कीं अरे आपल्याकरतां बाबांनीं एवढे कष्ट घेतलें, येवढी मदत केली व आपण मात्र त्यांना वाटेल तशीं नांवें ठेवून अक्षेप घेतले व संतसमागमाची संधि आपण आपल्या हातानें घालविली. नंतर सामान वगैरे बाहेर काढलें व व्हिक्टोरिया पाहूं लागलों तों एक व्हिक्टोरियावाला बोलवायला आला व लगेच सामान घेऊन त्यांना

व्हिक्टोरियांत बसविलें. टांगेवाल्यानें सांगितलें कीं, मला तुमचें घर माहीत आहे. त्या मंडळींनींच मला स्टेशनवर यावयास सांगितलें. याप्रमाणें हा गृहस्थ घरीं आला. घरच्या मंडळींस कांहीं कल्पनाच नव्हती कीं गृहस्थ त्या दिवशीं घरीं येईल. सर्वांस आश्चर्य वाटलें. या व्हिक्टोरियावाल्यानें सामान वगैरे बाहेर काढून ठेविलें. या गृहस्थांनीं विचारलें कीं, " भाडें किती द्यावयाचें ? " व्हिक्टोरियावाल्यानें सांगितलें कीं, " तुमच्या खिशांत आठ आणे आहेत तेवढेच मला द्या. तेवढे पुरे होतील. या गृहस्थाच्या खिशांत आठ आणे आहेत हें कळलें कसें ? पुढें हे घरांत आले व मंडळींना म्हणाले कीं, ' तुम्ही व्हिक्टोरिया पाठविलीत म्हणून फार चांगलें झालें नाहींतर मला उशीर झाला असता. सर्व लोकांना हें ऐकून आश्चर्यच वाटलें व पुन्हां बाबांनीं आपल्याला व्हिक्टोरियावाल्याच्या रुपांतही दर्शन दिलें परंतु आपण त्यांना ओळखलें नाहीं हें आपलें दुर्दैव आहे. बाबांचें कौतुक करीत सर्वांना हळहळ वाटली. या गोष्टीवरून नानासाहेब चांदोरकरांच्या आख्यानांतील श्लोकांची व एकंदर सर्व आख्यानाची आठवण होते.

घेई वेडपिसें मशिदींत बसे लीनस्वरूपी असे ।
भिक्षा मागतसे कथा कथितसे ज्ञानोपदेशी तसे ॥
भक्तां रक्षितसे जगीं फिरतसे, रुपें बहू घेतसे ।
ऐशा प्रेमरसें नमूं मधुरसें त्या साईचत्सारसे ॥

आपला नम्र,
**श्रीपाद बाळकृष्ण देव.**

(७)

# एक अनुभवः—

जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव ॥

या ओवीवरून किंवा बाबांचें वाक्यः—

जो जो मज भजे जैशा जैशा भावें ।
तैसा तैसा पावे मीहि त्यासी ॥

या ओवीप्रमाणें श्रीसाईबाबा अचानक आपल्या संकटास कसें धांवून येतील तें सांगतां येत नाहीं. भाव-विश्वास मात्र पाहिजे. मागें साईलीलेंत आलेल्या ' वाटसरू ' या लेखकाच्या लेखांत ' परमेश्वरावर थोडासा विश्वास ठेवा, कीं त्याच्या शतपटीनें ईश्वराचा तुमच्यावर विश्वास बसतो ' हें वाक्य खरेंच आहे. परमेश्वरास दुसरें तिसरें कांहीं नको. पैसा नको, पेढे नको. खाऊ नको, अगर हार-अलंकार नकोत. तो फक्त भक्तांकडे विश्वास मागतो व तोच विश्वास आपण न देतां इतर वस्तू देतों. आपली समज एवढीच कीं, परमेश्वर या जिन्नसांनीं अगदीं संतुष्ट होऊन जाईल ! पण तसें नाहीं. तुम्हीं दिलेल्या गोष्टींत जर प्रेम नसेल-आपलेपणा नसेल, परमेश्वरावर विश्वास

नसेल तर त्या गोष्टी देवास नकोशा होतात व तो त्याकडे ढुंकूनही पाहत नाहीं. आतां माझाच अनुभव पहा ना—

मी शिरडी संस्थानच्या मॅनेजर ऑफीसमध्यें शिपायाचें काम करतों. त्या दिवशीं बुधवार होता. ता. ५–१२–५१. माझी बहीण गं. भा. छबुताई ही तीनचार महिन्यांपासून आजारीच होती पण वर नमूद केलेला दिवस विशेष आजाराचा व अत्यंत कठीण असा होता. सकाळीं मी नेहमींप्रमाण ६–३० ला ऑफीस उघडलें व ऑफीस साफ करून बहिणीच्या आजाराची चिंता करीत ऑफीसचें टपाल तयार करींत होतों. थोड्या वेळानें माझी सौभाग्यवती मला घरीं बोलविण्यासाठीं आली व ‘ बाईंनीं बोलाविलें आहे, त्यांचा जीव घाबरा होतो. तेव्हां आपण घरीं या ’ असें सांगितलें. तेव्हां ही गोष्ट मी श्री. मॅनेजर ( आम्हीं त्यांना काका म्हणतों ) यांना कळली व त्यांनीं मला सूंठसाखरेची मात्रा उगाळून दिली व ती पाजण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ती मात्रा मी बाबांचें नांव घेऊन बाईला पाजून दिली, व पुन्हां ऑफीसमध्यें आलों. आतां घरीं डॉक्टर नेल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशी परिस्थिति येऊन ठेपली. पण डॉक्टर नेणार कोणत्या आधारावर ! माझे या तीनचार महिन्यांत दीड–दोनशें रुपये खर्च झाले होते व मला पगार तर अवघ ३६ रुपये तो मला तर घरखर्चास पुरत नाहीं. व डॉक्टरची रोख बिलें भरण्याची परिस्थिति नाहीं तेव्हां आतां काय करावें या विचारांत होतों. प्रत्यक्ष भक्तांचा कैवार घेणाऱ्या श्रीसाईंच्या ऑफिसमध्यें चिंताग्रस्थ होऊन गेलों होतों पण त्या दयाघनाला माझी दया येत नव्हती का ! इतक्यांत एक सद्‌गृहस्थ ऑफिसमध्यें आले व मला म्हणाले कीं, “ आतां अभिषेक होतील का व नैवेद्य होतील का ? ” मी म्हणालों, “ अभिषेक होणार नाहींत पण नैवेद्य मात्र होईल पण पावती करण्यास येथें कोणीच नाहीं. ” मग ते म्हणाले, “ पैसे दुसऱ्याचे आणले आहेत व नैवेद्य झाले तर बरें होईल ” त्या सद्‌गृहस्थानीं मला ओळखलें कारण ते मागें एकदां शिरडीस आले होते. त्यावेळीं मी त्यांना उदी प्रसाद दिला होता तीच उदीप्रसादाची ही ओळख. ते म्हणाले, “ मला ओळखलें नाहीं का ? ” मी म्हणालों, “ मी ओळखलें पण आपलें नांव मला आठवत नाहीं. ” तेव्हां ते सद्‌गृहस्थ मला म्हणाले कीं, “ मी डॉ. महाजन ” असें ऐकतांच मला अत्यानंद झाला व बाबांच्या लीलेचें कौतुक वाटलें. मग डॉ० महाजन यांच्या पावत्या करून दिल्या व त्यांना सांगितलें कीं, “ डॉक्टरसाहेब, माझें एक खाजगी काम आहे ” तेव्हां ते म्हणाले, “ सांगा, आनंदानें करीन ” मी त्यांना बहिणीच्या आजाराची हकिगत सांगितली व त्याप्रमाणें त्यांनीं माझ्या म्हणण्याला मान देऊन बहिणीची तब्येत तपासावयास घरीं आले व औषधोपचार करून मला आनंदित केलें. डॉक्टरांचे मी श्रीसाईबाबांजवळ मनःपूर्वक आभार मानतों व त्यांचे माझ्यावर झालेले उपकार मी कधींच विसरणार नाहीं; अशी श्रीसाईबाबांजवळ प्रार्थना केली. अशाप्रकारें डॉ. साहेब विनामूल्य माझ्या घरीं येऊन माझ्या उपयोगी पडले व सुरवातीचे दोन श्लोक दिवसभर माझ्या तोंडांत घोळत राहिले. असा हा बाबांचा चमत्कार आहे.

श्रीसाईबाबा दूरच्या भक्तांच्या हांकेस धांवतात तर प्रत्यक्ष मी त्यांच्या जवळ असतांना माझ्या हांकेस न धांवतील हें शक्यतरी आहे काय ? श्रीसाईंच्या, इतक्या वर्षांच्या समाधीनंतरही आणखी एकदां, अस्तित्वाची जाणीव झाली. माझ्याप्रमाणें आपणा सर्वांवर श्रीसाईंचें असेंच प्रेम असो अशी त्या दयाघनाजवळ प्रार्थना करतों.

आपला,

**भिकाजी महादू बिडवे.**

(८)

# " श्रीसाईनाथ समर्थ "

शुक्रवार रात्रौ व शनिवार पहांटे

ता. १७–११–१९५१

मी शिरडीहून आल्यानंतर नियमितपणें श्री० पाताडे यांच्याकडे रात्रौ आरतीला हजर रहात असें. परंतु गुरुवार ता० १५ व शुक्रवार ता० १६ रोजीं मी पहिल्यानदां आलों तों आरतीला अवकाश होता म्हणून नंतर थोड्या वेळानें येईन असें ठरविलें पण दोन्हीं दिवशीं आरती मध्येंच झाली व मी मागाहून परत आल्यावर मला आरती चुकली. त्यावरून मला असें वाटलें कीं, श्रीसाईबाबा माझ्यावर रागावले आहेत.

श्रीसाईबाबा आपल्यावर रागावले आहेत असें मनांत आल्यावर मी शुक्रवारीं रात्रौ झोंपण्यापूर्वी असा निश्चय केला कीं, " श्रीसाईबाबा दर्शन देईपर्यंत जप करीत बसावयाचें, झोपावयाचें नाहीं; कमींतकमी २ वाजेपर्यंत तरी जागावयाचें याप्रमाणें निश्चयानें मी सुमोरें १ वाजेपर्यंत एकाग्र चित्तानें जप करीत होतों. जप चालू असतांना अंधारांत भिंतीवरील फोटोकडे तोंड करून तिकडे पहात होतों. अंधारामुळें दिसत नव्हतें. १ वाजण्याच्या सुमारास बाबा दृष्टीपुढें येत नाहींत म्हणून मला फार वाईट वाटलें व डोळयांतून सारखे अश्रु येऊं लागले. मी म्हणालों, " बाबा, मला आपल्याला दर्शन द्यावयाचें नाहीं कीं काय ? मी काय एवढा पापी, दुष्ट आहें कीं काय ? या मनःस्थितींत मी अर्धा तास होतों. तोंपर्यंत १॥ वाजला. १॥ वाजण्याच्या सुमारास फोटोवरील बाबांचे फक्त पाय व हात हालतांना दिसूं लागले. याप्रमाणें २–३ वेळां दिसलें. एवढ्यानें माझें समाधान होईना; व मी म्हणालों " मला दर्शन द्यावयाचें तर तोंड वगैरे सर्व अवयव दिसले पाहिजेत " यानंतर थोड्याच वेळांत फोटोचा भाग चकचकीत चांदीच्या प्रकाशानें व्यापून गेला. फोटोंतील बाबांची छाया चांदीसारखी चकचकूं लागली ( चंदेरी बनली ) व बाबांची पूर्ण मूर्ति दिसली. त्या मूर्तींत सजीवपणा होता. याप्रमाणें ३ वेळां दिसलें. त्यानें माझें समाधान झालें व मनांत म्हणालें, ' आतां दर्शन पुरें झालें. आतां आपण झोपूं. '

नंतर दोनच्या दरम्यानें मी झोंपलों. झोपेंत स्वप्नांत मी मशागत केलेल्या शेतांत गेलों. शेतजमीन भाजून व नांगरून पेरणीला तयार करून ठेवलेली अशी होती. त्या

शेताला मेरा घातलेल्या होत्या. असे त्या शेताचे बरेच भाग केलेले होते व मेरा हिरव्यागार होत्या. मी त्या शेतांत उभा राहून पश्चिमेकडे पहात होतों तों समोर श्रीसाईबाबा एका रुंद अशा मेरेवर बसलेले होते. त्यांच्या अंगांत पांढरी कफनी व डोकीस फडका होता. दाढी वाढलेली होती. याप्रमाणें फोटोंतील छायेप्रमाणेंच बाबा दिसले. त्यांनीं समोर एक चुला पेटविला होता. आणि त्या चुलींवर एक तांब्याचें मोठें भांडें ठेवलेलें होतें (बाबांची बहुदा हंडी असावी) त्या हंडीच्या बाजूलाच बाबा बसलेले होते. तेवढ्यांत मला माझा सावंतवाडींतील मोठा भाऊ श्री. अनंत हा दिसला. [तो साधारण वेडसरच आहे. त्याच्या वेडाचें कारण म्हणजे, तो पूर्वी साकोरीला श्री. उपासनी महाराज यांच्या मठांत श्रीउपासनी महाराज हयात असतांन जाऊन आला होता. तिकडून आल्यावर तो श्रीभगवत्‌गीता वाचीत बसावयाचा. नोकरीकडे लक्ष ठेवीत नव्हता. आरत्या, जप, भजन वाचन असें रात्रंदिवस २४ तास करीत बसायचा; त्यामुळें त्याची नोकरी गेली व तो घरींच रिकामा राहिला. ] तो मला म्हणाला, आपण श्रीसाईबाबांना नारळ ठेऊं या. माझ्या हातांत आरंभापासून नारळ होताच, तो मी माझ्या भावाच्या हातांत दिला. त्यानें तो आपटून बाबांच्या पुढ्यांतच फोडला. जोरानें आपटल्यामुळें त्या नारळाचा अर्धा भाग वर उंच उडाला व तो माझ्या अंगावर येतो व मला इजा होते असें मला वाटलें, पण त्या अर्धा नारळाचा भाग माझ्या पायांजवळ पडला. मी तो उचलून घेतला. भाऊ म्हणाला, 'आतां या अर्ध्या नारळाचें काय करणार.' मी म्हणालों, 'काय म्हणजे ! श्रीसाईबाबांकडे द्यावयाचा " असें म्हणून आम्हीं तो नारळाचा अर्धा भाग बाबांना द्यावयास निघालों; तोंच बाबा मोठ्यानें ओरडून म्हणाले, "माझ्याकडे कशाला. सर्वांना वांटा. आम्हीं तो नारळ, तेथें बरीच मंडळी होती त्यांना वाटला. त्या मंडळींत कोणीही ओळखीचा नव्हता.

प्रसाद वाटून झाल्यावर मी एकटाच पुढें गेलों. तेथें एका शेताच्या मेरेवर पाटावर श्री साईबाबांची मूर्ति ठेवून, दादरचें कोणीतरी एक जोडपें पूजा करीत असलेलें दिसलें. त्यांनीं मला प्रसाद दिला, तो मी खाल्ला. त्याठिकाणीं बाजूलाच झऱ्याचें स्वच्छ असें पाणी वहात होतें त्या झऱ्यांत मी हात पाय व तोंड धुतलें व पाणी प्यालों.

नंतर मी तेथून पुढें दुसऱ्या ठिकाणीं गेलों. त्या ठिकाणीं एक मोठी इमारत होती. त्या इमारतीमध्यें पूजा चाललेली होती. व पूजेच्या बाजूला श्रीबाबा बसलेले होते. देव्हारा ठेवून कसली तरी पूजा चाललेली होती. त्या पूजेला यात्रेसारखी गर्दी जमलेली होती. त्या गर्दीत मीही मिसळलों. त्या गर्दीतून श्रीबाबांनी मोठ्यानें "इकडे ये" अशी हांक मारली. मी जवळ गेलों व उभ्यानेंच नमस्कार केला. बाबांनीं मला खरबूजाची एक मोठी फोड दिली. ती मी घेतली व समोरच्या खोलीमध्यें विश्रान्तीसाठीं गेलों व ती सर्व फोड खाल्ली. एवढ्यांत इतर मंडळी तेथें आली व "श्रीबाबांनीं तुम्हालाच एकट्याला एवढ्या गर्दीत कसें ओळखलें व प्रसाद दिला. आम्हांला कां दिला नाहीं ?"

असें विचारूं लागली. त्यावर मी म्हणालों, " कितीही गर्दी असली तरी बाबा आपल्या भक्तांना ओळखून काढतात " त्यानंतर मी ४–४॥ ला जागा झालों.

॥ श्रीसाईनाथार्पणमस्तु ॥
॥ शुभं भवतु ॥

रामचंद्र सखाराम नाईक B. A.
मराठा समाज, १ ला माळा,
चामारबाग रोड,
परेल, मुंबई नं. १२.

---

॥ अभंग ॥

माझें आराध्य दैवत ॥ श्रीसांब साईनाथ ॥ १ ॥ मा०
वसे शीलधापूरी वास गोदातीरी ॥ अक्षयीं श्रीसाई नांदतसे ॥ २ ॥
जाईन मी तेथें घालीन लोटांगण ॥ पाहीन दयाघना आदीनाथा ॥ ३ ॥
अष्टभावें मन दाटलें गहींवरें ॥ आळवि प्रेमभरें अनंत हा ॥ ४ ॥

(१)

नाम घेतां मुखीं शीतळ शरीर ॥ इंद्रियां व्यापार नाठविती ॥ १ ॥
गोड गोमटें हें अमृतासी वाड ॥ केला करवाड माझ्या चित्तें ॥ २ ॥
रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग ॥ अंतर्बाह्य जग आणि मन ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझ्या नामाचीया बळें ॥ अवघीयांचें काळें केलें तोंड ॥ ४ ॥

(२)

क्षणोक्षणि तुमचे आठविन पाया ॥ माझ्या साईराया दयाघना ॥ १ ॥
नाम घेतां तुमचें समाधान चित्ता ॥ कृपा करीं आतां आदीनाथा ॥ २ ॥
नीवारीं संकटें तारीं अनाथासी ॥ घातलीसे मीठी चरणि तूझ्या ॥ ३ ॥
विनवित तुम्हां दीन हा अनंत ॥ राहोमाझें चित्त तुझ्या पायीं ॥ ४ ॥

(३)

मन माझें चपळ न राहे निश्चळ ॥ घडी एकपळ स्थीर नाहीं ॥ १ ॥
काम आणि क्रोध उंच हे पर्वत ॥ न राहेची चित्त तुझ्यापायीं ॥ २ ॥
निरोधीतों परी न मोडे विकार ॥ मोठीं दुस्तर विषय द्वारें ॥ ३ ॥
एकाचेंहि आम्हां न पडे दमन ॥ तव चरणीं मन अनंताचे ॥ ४ ॥

(४)

ठेवोनियां भाव साई तुझ्या चरणि ॥ पुरवी ही धणी कृपावंता ॥ १ ॥
नेईं पायांपाशीं शरण तुजशीं ॥ आतां चरणापाशीं ठाव देईं ॥ २ ॥
असशी उदार तूंचि रमावर ॥ मजशीं आधार तुझा आतां ॥ ३ ॥
विनवित तुज दास हा अनंत ॥ ठाव चरणाप्रत देईं आता ॥ ४ ॥

(५)

जुनाट योगी आया भाई ॥जु॥ शिलधापुरमें आकर बाबा साईनाम धराया ॥ १॥
बा, चिलीमसटका हातमें लेकर शीरमें कपडा बंधाया ॥ २ ॥
बा, जु॥ शीर्डी आकर आसनसे बैठा बत्तीमें पाणि जलाया ॥ ३ ॥
बा, सा. जु. ॥ अनंत कहे ये योगीनाथ परब्रह्म अवताराया बा. जु. यो. आ. ।

॥ अभंग ॥

जोडितों मी हात येतों काकुळती ॥ चरण तुझे चित्तीं राहो माझ्या ॥ १ ॥
असशि उदार दयाघना साई ॥ ठेवितों मी डोई चरणि तूझ्या ॥ २ ॥
मज अनाथाची पुरवावि आस ॥ नेई चरणा प्रत अनंतासी ॥ ३ ॥

---

आठवितां तुझे चरण साईबाबा ॥ हरतसे चिन्ता संसारींची ॥ १ ॥
भक्तभावें तुझें नाम घेतां मुखीं ॥ संकटें पळती वनांतरा ॥ २ ॥
अनंत हा तुज येतो काकुळती ॥ चरणिं ठाव देई साईराया ॥ ३ ॥

---

आतां साई राया ठाव देई चरणिं ॥ तुजविण मज नाहीं कोणी ॥ १ ॥
तूंच माझी माता पिताही तूंची ॥ बंधु तूची देवा श्रीसाईनाथा ॥ २ ॥
मज आनाथासी ठाव देई चरणीं ॥ लीन झाला पायीं अनंत ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

मना तुलारे सांगतों एक आतां ॥
भजे सर्वकाळ श्रीसाईनाथा ॥
नको आठऊं कांहीं प्रपंच वार्ता ॥ १ ॥
नको आठवूं युक्ती नाना विचार ॥ २ ॥

नको आठवूं गृह दारा आणि सुत ॥
सदां सर्व काळ भजे साईनाथ ॥ ३ ॥
सर्वां भुतीं श्रीसाईराम पाहीं ॥
सर्वां अंतरीं जो वसे सर्व दाहीं ॥ ४ ॥
सदां सर्वकाळ आठविं स्वरूपाला ॥
धरीं शुद्ध भाव नीत्य भक्ती ॥
मग होय विरक्ती तुझीया देहाला ॥ ५ ॥
मनाचा दयाळु असे साई राया ॥
दास हा अनंत नमीतसे पाय ॥ ६ ॥

---

॥ पद ॥

जगत्‌वंद्य श्रीसाई दयाघन रमानाथ हा अवतरला ॥
सगुण रुपें येऊनी शिर्डी गोदातीरीं राहीला ॥ १ ॥
भक्तांचीं संकटें निवारूनी सन्तजनासम राहीला ॥
नित्य करूनियां गंगास्नान लिंबा खाली बैसला ॥ १ ॥
प्रथम प्रसिद्धी चांदपाटील बोधीला ॥
एक मास वनी फिरवुनी त्याला अवचीत घोडा दाविला ॥ ३ ॥
आत्मबोध करूनीयां सन्मार्गासीं लाविला ॥
भीष्म पाटील सर्व मिळोनी संतमेळ कीं हो झाला ॥ ४ ॥
कैलासावरी असतां देव त्रिशुळ डमरू हातीं घेतला ॥
येथें घेऊनी चीलीम सटका लिला दाविती भक्तांला ॥ ५ ॥
पुंडलीकासाठीं विटेवरी उभा पंढरी राहीला ॥
नामदेवाने भाव धरूनी पात्रीं विठ्ठल जेवविला ॥ ६ ॥
या कलीयुगीं धर्म चालला लयाला ॥
संसारीजन द्रव्यलोभानें एक मारीती एकाला ॥ ७ ॥
ऐसें पाहुनीयां माझा भोळा नाथ अवतरला ॥
शीलधापुरीं येऊनीयां धरीं साईनामाला ॥ ८ ॥
दीन अनंत विनवीतसे हो तुम्हां सकळ लोकांना ॥
जाऊनी शिर्डी घट्ट धरूंया बाबांच्या चरणाला ॥ ९ ॥

॥ अभंग ॥

असें मी पतीत श्रीसाईनाथा ।। पाहातोसी काय अंत माझा आतां ।। १ ।।
पतीत पावन नाम तुझें असतां ।। अव्हेरकां माझा करीशी बापा ।। २ ।।
देईं कृपादान श्रीसाईनाथा ।। रमावरा आतां कृपा करी ।। ३ ।।
नमीत अनंत तुम्हां साईराया ।। कृपा करीं आतां दयाघना ।। ४ ।।

माझ्या अंतरीचें जीवन ।। स्मरा साई राम वेळोवेळां ।। १ ।।
सगुण स्वरुप साई दयाघन ।। वंदीन चरण प्रेमभावें ।। २ ।।
क्षीरसागरींचें असे हें निधान ।। उद्धराया जन शिर्डी आले ।। ३ ।।
बहुत तारीलें जगीं भक्तजन ।। तव चरणीं मन अनंताचें ।। ४ ।।

साई रुप पाहतां डोळां ।। पुरेल मनींचा सोहळा ।। १ ।।
ध्यानी निरंतर जपा साईनाम ।। स्मरारे राम प्रातःकाळीं ।। २ ।।
सगुण साजीरें साईचें हें रूप ।। सुंदर तें ध्यान दिसतसे ।। ३ ।।
जिवेंभावें करा यासीं लिंबलोण ।। करारे स्मरण प्रेम भावें।। ४ ।।
लीन हा चराणि याचक अनंत ।। राहो माझें चित्त साई चरणिं ।। ५ ।।

अभंग

उठतां बसतां कार्य हा करितां ॥ आठवा अनंता साईबाबा ॥ १ ॥
मग तो कृपाळु श्रीसाईनाथ ॥ निवारी संकट क्षणमात्रें ॥ २ ॥
आसनीं शयनी भोजनी गमनी ।। आठवा बा ध्यानी साईनाथ ।। ३ ।।
पूर्णब्रह्म माझा असे साईनाथ ।। अनंत नमीत दृढ भावें ।। ४ ।।

---

बहुत जन्मींचा शिण उतरला ।। सद्गुरु देखीला साईराज ।। १ ।।
शिरडींत उभा चैतन्याचा गाभा ।। वाट पहातसे भक्तांचीया ।। २ ।।
समर्थ तो माझा श्रीसाईनाथ ।। विघ्नें निवारीत सर्व माझीं ।। ३ ।।
भाव धरोनीयां भजे जो तयासीं ।। सर्व काळ त्यासि साह्य करी ।। ४ ।।
माझा मायबाप श्रीसाईनाथ ॥ अनंत नमीत दृढभावें ।। ५ ।।

---

गोदातीरीं उभा असे श्रीरंग ॥ साईबाबा नाम धरोनियां ॥ १ ॥
कळोंनेदी कोणा जात गोत कांहीं ॥ स्वरूपीं मीळवि नीजभक्तां ।। २ ।।

माझा आदीनाथ उभा शिरडींत ॥ चला जाउं त्वरित पाहावया ॥ ३ ॥
पूर्वसुकृताची जरी असे जोड ॥ पुरविल कोड अनंताचे ॥ ४ ॥

### पद (२) रें

दे पायांची जोड साई दे पायांची जोड ॥
आंस लागली तव चरणाची ॥
चिन्ता मनींची तोड ॥ १ ॥ साई दे० ॥
चांदपाटील तव नामें तरला ॥
निष्ठा त्याची थोर ॥ २ ॥ साई०
संतासंगें नीत्य वसशीं तूं ॥
पुरवी मनिंचें कोड साईनाम तु ॥ ३ ॥
दीन अनंत हा विनवितसे तुज, दे नामाची जोड ॥ ४ ॥ सा०

### अभंग

धांव घेई साईराया अंत नको पाहुं ॥
बुडलों भवसिंधुमाजी अंत नको पाहुं ॥ १ ॥
आहे मी अपराधी दीन पतीत ॥
तारीं मज दीनदयाळा होई कृपावंत ॥ २ ॥
ज्ञानहीन मतीहीन । असें मी पामर ॥
दावीं तव दीव्य पाय करीं गा उद्धार ॥ ३ ॥
अनंत म्हणे देवा देई मज प्रेम ॥
अखंडित नाम गाईन मी ॥ ४ ॥

सुख वाटे तुझे गुण वर्णावया ॥ भेट देई सखया साईराया ॥ १ ॥
द्वारकामाईंत असशी नीजला ॥ धांवोनी मजला भेट देई ॥ २ ॥
शिर्डीत जरी असशी बैसला ॥ येवोनी मजला भेटी देई ॥ ३ ॥
विनवि अनंत गहींवरोनीयां ॥ तारी मज आतां साईराया ॥ ४ ॥

अनाथाचा नाथ श्रीसाईनाथ ॥ येतसे धांवत भक्तांलागीं ॥ १ ॥
अंतरीं धरोनी प्रेम दृढभाव । साईनाथ रूप आठवावें ॥ २ ॥
तारील संकटीं शिर्डीचा राम ॥ भावें धरा प्रेम साईनामी ॥ ३ ॥
विनवी अनंत जोडोनीयां पाणि ॥ साईनाथ चरणीं ठेवा मन ॥ ४ ॥

॥ भजन ॥

साईनाथा दयाकरीं दयाकरीं ॥ योग माया आवरीं ॥ १ ॥

॥ आरती ॥

ओंवाळुं आरती श्रीसद्गुरू साईनाथा ॥ भावें चरणावरी ठेविला माथा ॥ १ ओ.

तवपदकमलीं नमन करोनी शरण असें आतां ॥ सुमती देईं यादीनासीं
धांव पाव ताता । नको दुर करूं श्रीसद्गुरू साईनाथा ॥ २ ॥

नलगे अंत आधीं तुझा ठाव शोधींतां ॥ चौघां जणासीं मौन पडलें गुण तुझे गातां ॥
बावन्नासीं नकळे अंत तुझा साईनाथा ॥ ३ ॥ ओ.

बाबा तुझे गुण वर्णीतां मोहीयलें मन ॥ गोदावरी हीच सत्रावि वाहातसे जाण ॥
औट पीठ हें शिर्डी क्षेत्र हो पूर्ण ॥ ४ ॥ ओ० ॥

द्वारकामाई हेच नीरंजन वन असे जाण ॥ चौशुन्याचा मंचक ब्रह्मरंध्रीं पाहोन ॥
तेथें पहुडला आदीनाथ दयाघन ॥ ५ ॥ ओ० ॥

जो नर शुद्ध मनानें गाई साईचे गुण ॥ लोभ सांडुनी करा साईरामाचें भजन ॥
दीन अनंत हा करी साईनाथाचें भजन ॥ ६ ॥ ओ० ॥

---

अभंग

ठेवोनीयां भाव साई तुझ्या चरणीं ॥ अहर्निशीं गूणगाईन मी ॥ १ ॥
करीतां नामजप ॥ तुटती भवपाश ॥ शांतता चित्तास येत असे ॥ २ ॥
नको पाहुं अंत आतां बाबा साई० ॥धांव माझे आई शीरडीचे ॥ ३ ॥
ठाव देईं चरणीं नको लोटु दूर ॥ करी कृपा मज नारायणा ॥ ४ ॥
संतसमागम देईं सर्व काळ ॥ देईं मज प्रेम सर्व काळ ॥ ५ ॥
दास हा अनंत विनवित तुज ॥ कृपा करी मज साईबाबा ॥ ६ ॥

जळो ते जाणिव जळो ते शाणिव ॥ राहो माझा भाव साई चरणीं ॥ १ ॥
जळो ते आचार जळो ते विचार ॥ राही मन स्थीर साईपायीं ॥ २ ॥
बैसोनी एकांतीं नाम घेतां मुखीं ॥ जेणें होय शांती माझ्या चित्ता ॥ ३ ॥
विनवी अनंत अहो देवराया ॥ साईनाथ सखया तारी मज ॥ ४ ॥

जाऊं कोणा शरण तुजविण साई ।। धांव माझे आई पाव मज ।। १ ।।
मज अनाथासीं पाजीं प्रेमपान्हा ।। येऊं दे करुणा माझे आई ।। २ ।।
गोड तुझें नाम साऊले जननीं ।। लीन असे चरणिं अनंत हा ।। ३ ।।

## अभंग

माझें आराध्य दैवत ।। दयाळु साईनाथ ।। माझें आ० दै ।।
चला शीलधापुरीं जाऊं ।। रमावर नयनीं पाहूं ।। २ ।।
धन्य धन्य गणुदास ।। भक्ती मोहीलें साईबाबांस ।। ३ ।।
अनंत म्हणे केशव जननी ।। नयनीं दावीं साईमाऊली० ।। ४ ।।

## अभंग

साई सखा कुणी दावा हो ।।
साई सखा मज दावा ।। १ ।।
दीन अंध मी मार्ग न ठावा ।।
हात दयेचा द्यावा हो, साई सखा मज द्यावा ।। २ ।।
साई शिर्डीवासी म्हणती ।।
ब्रींदावनी तों कुणी पाहाती ।।
गिरीकंदरी भेटे कुणी म्हणती मनोमंदरीं कुणी
पहा हो दीप असा उजळावा ।। ३ ।।
प्राथितसे हा दीन चातक दा० ।।
तुम्हां विनवित साईराम —
मज भेटवा हो, साई सखा मज दावा ।। ४ ।।

## अभंग.

पाहिलीया तुमचे चरण साई ।। शांत होते हें मन ।। १ ।। पा. ।।
गुण तुमचें गातां मुखीं ।। विघ्नें कांहीं न बाधती ।। २ ।।
प्रेम भावें नाम घेतां ।। आठवती न प्रपंच वार्ता ।। ३ ।।
अनंतासीं नाहीं धीर ।। केव्हां पाहीन रमावर ।। ४ ।।

## अभंग

शिरडीसी जावें ऐसें मनी वाटे ।। माझें मनीं वाटे ।। १ ।।
साई माऊली केव्हां भेटे ।। १ ।।

नाहीं तयावीण मज सुखी अंतरीं ।। तळमळ मज लागलीसे ।। २ ।।
अनंत म्हणे जेव्हां पाहीन पाय ।। भव दुःख जाय सर्व माझें ।। ३ ।।

**अभंग**

कृपा करा आतां साईनाथ देवा ।। ठाव चरणा प्रत मज द्यावा ।। १ ।।
दीन मी रंक विनवित तुम्हां ।। द्या हो मज प्रेमा सर्व काळ ।। २ ।।
तुमच्या स्मरणे तुटती भवपाश ।। विनवित दास अनंत हा ।। ३ ।।

---

# -: शिरडी-वार्ता :-

## माहे सप्टेंबर १९५१

या महिन्यांत बाहेरगांवचे व जिल्ह्यांतील आजुबाजूचे पुष्कळ भक्त श्रीसाई-बाबांच्या दर्शनास येऊन गेले.

**देणगीः**—देणगीदाखल निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू, चांदी-सोनें-पितळेचे जिन्नस व कपडे असे २५ भक्तांकडून देणग्या आल्या. श्री. एस. डी. व्यंकटेश-टिळक नगर यांजकडून एक रेडियो रु. २८३, तार ५ रु. व अर्धावार कापड ऑईल क्लॉथ ता० २ रु. असे एकूण २९३ रुपयांचें सामान देणगीदाखल आलें.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्रपूजा, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनिभोजन अन्नदान वगैरे भक्तांचे विधि दररोज संस्थानकडून यथासांग केले गेले.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांची श्रीगणेशचतुर्थी निमित्त, भाद्रपद शु० ११ व भाद्रपद व० ११ अशीं तीन कीर्तनें श्री मंदिरांत झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. विश्वनाथबुवा आळेकर व श्री गंगाबाई नाशिक यांनीं कीर्तनाची हजेरी श्रीमंदिरांत दिली.

**नवलविशेषः**—श्री. वासुदेव जनार्दन गोस्वामी, मुंबई यांनीं नवरसनाट्यदर्शन करून दाखविलें. नवप्रभा म्युझिक सर्कल अ. नगर येथील मुलींच्या मेळ्याचा कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा व नृत्यसंगीत गायन झालें (चालक श्री. सुपेकर) श्री. लोंगरसी उद्धवसी पनवेलकर भजन मंडळी यांचा संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. श्री, माणिकबाई बेलापूरकर, श्री. सरूबाई बेलापूरकर, श्री. हिराबाई तांदूळवाडकर, श्री. गुलाबबाई अष्टीकर, श्री. मथुराबाई अष्टीकर, श्री. गंगूबाई अष्टीकर, श्री. तुळशीदास वैजापूरकर यांनीं श्रीपुढें संगीत गायन हजेरी दिली.

श्री. यमुनाबाई दांडेकर नाशिक यांनीं श्रीपुढें श्रीज्ञानेश्वरी प्रवचन केलें. श्री. जोधपूरकर यांनीं कळसूत्री बाहुल्यांचें नाटक करून दाखविलें. श्री. शंकर लक्ष्मण गोरे, मुंबई, श्री. नटसम्राट नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्व व श्री. गोहराबाई, श्री. श्यामाबाई यांनीं श्रीपुढें संगीत गायन भजन केलें. लो० ट्रस्टी श्री बाजीराव पाटील कोते यांनीं त्यांचे आभार मानल्यावर समारंभ समाप्त झाला.

पॉवर हाऊसमध्यें नवीन मोठें इंजिन व डायनामो उत्तम सिमेंट कांक्रीटचे पायासह बसवून दिवे चालू झाले आहेत. तसेंच रस्त्यावरही मोठ्या प्रकाशाचे दिवे बसविले आहेत. मॅनेजर ऑफीसमध्येंही उत्तम तऱ्हेचें फर्निचर केलें आहे.

श्रीसाईबाबा होमियो धर्मार्थ दवाखान्याचा पुष्कळ लोक फायदा घेत आहेत. शिरडीचें हवापाणी उत्तम आहे.

---

## माहे ऑक्टोबर १९५१

श्रीसाईबाबांचा पुण्यतिथि उत्सव या महिन्यांत आल्यामुळें श्रीसाईचे दर्शनास नेहमींपेक्षां विशेष गर्दी होती.

**देणगीः**—या महिन्यांत कापड, सोन्याचांदीचे व पितळीचे जिन्नस तसेंच फर्निचर वगैरे ५४ भक्तांकडून निरनिराळे जिन्नस श्रीसाईस देणगीदाखल आले. श्री. आर. डी. बॅनर्जी, मुंबई यांनीं सुमारें ७५ रुपयांची होमियोपाथी औषधें दवाखान्यास देणगीदाखल दिलीं.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, ब्राह्मण—सुवासिनीभोजन व अन्नदान वगैरे विधी संस्थानतर्फें यथास्थित पार पाडलें गेलें.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांचीं दोन कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. एस्. बी. देव (संस्थान ट्रस्टी) ठाणें यांची दोन कीर्तनें झालीं. श्री. ह. भ. प. मारुतीबुवा रद्दातेकर. श्री. एच् बाबुराव बेळगांवकर व श्री. डॉ. गव्हाणकर कुर्ला यांनीं कीर्तन श्रीमंदिरांत केलीं.

**नवलविशेषः**—

| नांव | |
|---|---|
| श्री. कृष्णराव मेहेंदळे, पुणें | गायन |
| श्री. मारुतीराव दोंदेकर | ,, |
| कु० कृष्णाबाई वामन धुरंधर, मुंबई | ,, |
| श्री. श्रीमतीबाई नार्वेकर, मुंबई | ,, |
| कु० लीला नार्वेकर | ,, |
| श्री. वसंत रामनाथकर | ,, |
| श्री. सौदागर रामनाथ गोरे (छोटा गंधर्व) मुंबई | ,, |

नांव

| | |
|---|---|
| श्री. बी. के गवळी, मुंबई | गायन |
| श्री. भास्कर आत्माराम खानोलकर, दादर | ,, |
| श्री. शांताराम श्रीधनकर, मुंबई | ,, |
| श्री. सहदेव नार्वेकर, मुंबई | ,, |
| श्री. रामचंद्र रामराव बोरकर | फ्ल्यूट वादन |
| श्री. आनंदा सखाराम विंचूरकर मंडळी | भजन |
| श्री. केदारशर्मा, कसबा खेडा | ,, |

पिंपळवाडी बँड पथक व शिर्डी बँड पथक यांनीं बँडची हजेरी दिली.

दिपवाळीनिमित्त श्रीस मंगलस्नान, लक्ष्मीपूजन, श्रीमंदिरांत करण्यांत आलें. दिपोत्सव व शोभेची दारू उडवून दिवाळी साजरी करण्यांत आली. दिपवाळीनिमित्त सर्व नोकर वर्गास संस्थानकडून चहा फराळ देण्यांत आला. या महिन्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळें बागेस पूर येऊन फुलझाडांची फार नुकसानी झाली.

हवापाणी उत्तम आहे.

# —: श्रीसाईनाथ प्रसन्न :—

## श्रीपुण्यतिथि उत्सव शके १८७३

श्रीसच्चिदानंद सद्गुरु श्री साईनाथ महाराज, संस्थान शिर्डी, ता० कोपरगांव, जि० अहमदनगर यांचा पुण्यतिथि उत्सव आश्विन शु० १० शके १८७३ मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार अशा दिवशीं झाला. उत्सवप्रारंभ ता. ९–१०–५१ रोजीं होऊन तो शुक्रवार ता. १२–१०–५१ रोजीं समाप्त झाला. यंदा विजयादशमी नवमीस आल्यामुळें उत्सव एक दिवस वाढवावा लागला.

उत्सवास मुंबई, पुणें, ठाणें, कल्याण, नाशिक, जळगांव, हैदराबाद व मद्रास कडील लोक आपल्या कुटुंबांतील मंडळीसह श्रींचे दर्शनास येऊन गेले.

**उत्सवाचा कार्यक्रमः—मंगळवार** ता. ९–१०–५१ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारीं कीर्तन. श्री. कृष्णराव मेहेंदळे, पुणें यांचें गायन, नंतर स्थानिक नाट्यमंडळीचा ‘नरवीर मालुसरे’ नाट्यप्रयोग झाला. **बुधवार** ता. १०–१०–५१ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळीं गांवांतून भिक्षा, श्रींचे समाधीस अभिषेक अर्चन, लघुरुद्र, पूजा वगैरे विधी पार पडल्यावर समाधीस मंगलस्नान घालण्यांत आलें. समाधीस वस्त्रार्पण, पुष्पार्पण झाल्यावर संस्थानचे सन्माननीय विश्वस्त श्री. श्री. बा. देव ठाणें यांचें श्रीसाईपुण्यतिथि आख्यानावर कीर्तन झालें. नंतर माध्यान्ह आरती होऊन महाप्रसाद वांटण्यांत आला. रात्रौ श्रींचे पालखीची मिरवणूक गांवांतून काढण्यांत आली, नंतर जागर करण्यांत आला त्यांत खालील कलावंतांनीं भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| श्री. दामुअण्णा बेलापूरकर | सनईवादन |
| श्री. शंकरराव कोपरगांवकर | ,, |
| श्री. दत्तोपंत गुरव | तबलावादन |
| श्री. रंगनाथ मिराणे | ,, |
| श्री. चिंतामणराव टिळक | गायन |
| श्री. बाबुराव जहागिरदार | ,, |
| श्री. एस्. पी. पाटील, कोपरगांव | हार्मोनियमवादन |

**गुरुवार** ता. ११-१०-५१ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळीं गांवांतून भिक्षा, नंतर श्रींचे समाधीस पूजा वगैरे झाल्यावर समाधीस मंगलस्नान घालण्यांत येऊन वस्त्रार्पण पुष्पार्पण झालें. नंतर श्री. विठ्ठलराव यांचें कीर्तन होऊन माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद सगळ्यांस वांटण्यांत आला. रात्रौ श्रींची पालखींतून गांवांत मिरवणूक काढण्यांत आली. नंतर श्री. देव, ठाणें यांचें कीर्तन झालें. **शुक्रवार** ता. १२-१०-५१ रोजीं सकाळीं श्रींच्या जुन्या कपड्यांचा लिलांव विक्री करण्यांत आली. नंतर ह. भ. प. श्री. मारुतीबुवा रहातेकर यांचे कालाकीर्तन होऊन हंडी फोडण्यांत आली व उत्सव समाप्त झाला. रात्रौ कु. शैला शिऊर, श्री. सूर्यकांत मोहिले, श्री. रामचंद्र टाकळे व श्री. सुदीश शिऊर यांचें मिळून तबलावादन, गायन, फिडलवादन वगैरे कार्यक्रम झाला.

रविवार ता. १४-१०-५१ रोजीं संस्थानची वार्षिक सभा झाली. रात्रौ कोजागिरीपूजा होऊन संस्थानचे सन्माननीय दु. खजिनदार डॉ. गव्हाणकर यांचें कीर्तन झालें. सन्माननीय खजिनदार श्री. कीर्तिकर यांचे हस्तें रात्रौ १२ वाजेपर्यंत अभिषेक करण्यांत आला व चंद्रपूजा करून सर्वत्र मंडळीस दूधप्रसाद देण्यांत आला. श्रीगणेश साईमंडळ कुर्ला यांचा एक तासाचा भजन कार्यक्रम झाला. अशाप्रकारें उत्सव शांत रीतीनें व आनंदांत पार पडला.

## माहे नोव्हेंबर १९५१

या महिन्यांत श्रीसाईंचे दर्शनास बाहेरगांवचे व आजुबाजूचे बरेच भक्त आले.

**देणगीः**—या महिन्यांत ४६ भक्तांकडून कापड, सोनें चांदी व पितळेचीं भांडीं तसेंच फर्निचर व पुस्तकें श्रीसाई संस्थानास देणगीदाखल आले.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे विधी श्रीसंस्थानकडून यथास्थित पार पडले.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांचीं ४ कीर्तनें, कार्तिक शु० ११, कार्तिक वद्य ११ श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथि व भक्तांच्या आग्रहास्तव एक अशीं झालीं.

**नवलविशेषः**—कार्तिक महाएकादशीस श्रींचे समाधीस मंगलस्नान व गांवांतून पालखीची मिरवणूक काढण्यांत आली व नंतर कीर्तन झालें. द्वादशीस तुलसीविवाह झाला आलेल्या भक्तगणांपैकीं खालील कलावंतांनीं श्रीमंदिरांत श्रीपुढें आपली हजेरी लाविली.

नांवः—

| | | |
|---|---|---|
| श्री. दामुअण्णा बेलापूरकर | | सनईवादन |
| श्री. रंगनाथ मिराणे | | तबलावादन |
| श्री. बाबूराव साळवेकर, धुळें | | गायन |
| श्री. बी. आर्. अत्रे | | गायन |
| श्री. श्रीनिवासराव पुणतांबेकर, मुंबई | | ,, |
| श्री. रतन पै, मुंबई | | ,, |
| श्री. केशवराव रानडे | | तबलावादन |
| श्री. एस्. वी. भट, पुणें. | | गायन |
| श्री. जी. एस्. कारखानीस, जळगांव | | तबलावादन |
| श्री. वेणुबाई<br>श्री. साखरबाई<br>श्री. बेबीबाई | शिर्डी | संगीत भजन व गायन |
| श्री. दत्तोपंत गुरव | | तबलावादन |
| श्री. सुनाथ गुरव, शिर्डी | | हार्मोनियम वादन |

मे. डि. से. जज्ज साहेब, अहमदनगर यांची स्वारी. ता. २२ रोजीं तपासणीसाठीं मुद्दाम शिर्डीस आली होती. त्यावेळीं संस्थान ट्रस्टी, ऑ. सेक्रेटरी वगैरे मंडळी शिर्डीस हजर होती. सर्व तपासणीनंतर त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

श्रीसाईबाबा दवाखान्यांत या महिन्यांत सुमारें १५०० लोकांनीं औषधोपचाराचा फायदा घेतला. डॉ० पी. रुस्तुमजी यांचें काम फार लोकप्रिय होत आहे.

हवा पाणी उत्तम आहे.

---

## माहे डिसेंबर १९५१

या महिन्यांत बाहेरगांवच्या पुष्कळ भक्तगणांची शिरडीस गर्दी झाली होती.

**देणगीः**—या महिन्यांत ५३ साईभक्तांकडून, सोनें–चादी, पितळीचे जिन्नस, कापड व लांकडी सामान श्रीसाईसंस्थानास देणगी दाखल आलें.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, नैवेद्य, ब्राह्मणसुवासिनी-भोजन, अन्नदास वगैरे भक्तांचे विधि संस्थानकडून व्यवस्थित करविले गेले. श्रीभक्तांनीं २२ सत्यनारायणाच्या पूजा श्रीमंदिरांत केल्या.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांचें श्रीदत्तजयंतीनिमित्त या महिन्यांत कीर्तन झालें.

**नवलविषेशः**—श्रीदत्तजयंती प्रित्यर्थ जन्मोत्सव कीर्तन, दुसरे दिवशीं पालखीची गांवांतून मिरवणूक, तीर्थप्रसाद असा कार्यक्रम झाला.

श्री. दत्तात्रेय पांडुरंग उर्फ मामा फडके कल्याण यांनीं आपल्याबरोबर आणलेल्या मंडळींसमवेत श्रीचा नामसप्ताह, आरती भजन–श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी पठण, श्रीसाईसत्चरित्र वाचन वगैरे विविध कार्यक्रम ७ दिवसपर्यंत केले.

खालील श्रीसाईभक्तांनीं श्रीपुढें विविध कार्यक्रम करून श्रीसाईचें तसेंच भक्त–श्रोत्यांचें मनोरंजन केलें.

| | |
|---|---|
| श्री. पंडित पद्मनाभ पालयेशास्त्री, मुंबई | प्रवचन |
| श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर, मुंबई | प्रवचन |
| श्री. लक्ष्मणराव देशपांडे, मुंबई | संगीत भजन |
| श्री. विष्णु भास्कर कुळकर्णी, बडोदा | भजन |
| श्री. सय्यद मिया, बडोदा | कवालीगायन |
| श्री. पुरुषोत्तम गंगाराम उंबरे, कल्याण | बांसरीवादन |
| श्री. भाई शिरोडकर, मुंबई | संगीत भजन |
| श्री. सूर्यकांत मोहिले<br>श्री. शशिकांत सोहोनी } मुंबई | ,, |
| श्री. पंडितराव नगरकर<br>श्री. वसंतराव देशपांडे<br>श्री. मधुकर टाणदार<br>श्री. शाम देवरे } मुंबई... | ,, |
| श्री. एम्. गोविंदस्वामी, सिकंदराबाद | भजन |
| श्री. धोंडीराम वाघे, धुळें | पोवाडे गायन |
| श्री. फिरोज दस्तुर, मुंबई | गायन |
| श्री. पंडित जगन्नाथबुवा सुरतकर<br>श्री. किसनराव व श्री. वसंतराव } | साकोरी–संगीत गायन–भजन |
| श्री. भाऊराव शिंदे, खेड | भजन |
| श्री. मुरुगाहास, त्रिची | गायन |
| श्री. शंकरराव गोरे | ,, |

ता० २५–१२–५१ रोजीं संस्थान कमिटीची मिटिंग शिर्डीस झाली. नवीन बांधकाम श्री. नवलकरवाडा पश्चिम बाजूस चालू झालें आहे. श्री. रामदास मंगळूरकर श्रीचे दर्शनास आले होते

शिरडी येथील हवापाणी उत्तम आहे.

श्री. एन्. एल्. हेबळीकर पुणें यांजकडून १६७ तोळे वजनांच्या दोन चांदीच्या समया देणगीदाखल आल्या आहेत.

सेक्रेटरी

## SHREE SAI BABA.

The usual Maha Samadhi celebration of Shree Samartha Sai Nath Maharaj will take place at the undersigned's place this year as shown below:—

### AKHAND NAM:-

From 10 hours of Wednesday 10th Oct. or after puja and Arti to 10 hours of Thursday 11th Oct i. e. 24 hours.

### RUDRA-ABHESHEKH-PUJA:-

On Thursday 11th Oct. at about 10 hours which will be completed at about 12 hours in the noon same day.

### BHAJAN-ARTI-MANTRA-PUSPHA:-

On 11th Oct. (Thursday) in the evening at about 20-30 hrs and will be completed late at night.

### GOPAL-KALA:-

On Friday 12th Oct. at 17 hours.

### HARI-KIRTAN:-

Mr. RANADE Bsc. of Ratlam has agreed to perform Kirtan which will be held on Friday 12th Oct. at 21 hours and will be completed late at night.

All Sai Bhaktas are requested with their family and children at all celebration and receive the spiritual blessings of Shree Samartha Sai Nath Maharaj according to their capacity.

R. B. Pitkar.
Retired Chief Clerk.
Distt. Traffic Supdt' Office,
KOTAH.

3 rd Rangpur Road,
Kotah Jn.
27-9-51.

॥ श्री साई प्रसन्न ॥

१०५ जे ताराबाग, लव्हलेन,
माझगांव मुंबई नं. १०.
ता. २०-१२-१९५१

प्रिय गुरु बंधू यांस :—

सप्रेम प्रणाम वि. वि. सोबत आपण भरून पाठविण्याकरितां नवीन अर्जाचा नमुना तयार आहे. ह्याबाबत जरूर ती जाहिरात निरनिराळ्या वर्तमानपत्रांत दिली आहे. परंतु ती कदाचित आपल्या अवलोकनांत आली नसल्यास आपलें नांव मतदारांच्या व भक्तांच्या यादींत येणार नाहीं म्हणून हा अर्ज आपण भरून, सही करून, व जरूर ती रकम आपण मनीऑर्डरनें / अगर रोख अर्जांत दिलेल्या पत्त्यावर [ चिटणीस **श्री साईबाबा संस्थान** C/o नाझर–जिल्हा न्यायमंदिर, अहमदनगर ] पाठविण्याची विनंती आहे. सामान्य सभासदाची वार्षिक वर्गणी रु. ५ आहे.

आपला गुरुबंधू,
**द. बा. राणे**
सन्मा. चिटणीस
श्री. साईबाबा संस्थान
कमिटी.

SHREE SAI

105 J. Tara Baug, Love Lane,
Mazgaon, Bombay 10.
Dote 20–12–1951.

Dear Guru–Bandhu,

Herewith you will find an application in new form, for being filled & signed by you & for being sent to the address given in the application. Advertisements with regard to this have been published in various news–papers. But in case you have not come across the said advertisement, it is likely that your name may not appear in the list of voters & in the Bhakta--Mandal Registers. I request you to send your Donation / Subscription to the Hon: Secretary, Shree Sai Baba Sansthan C/o the Nazir, Distrist Court, Ahmedngar. Yearly subscription for ordinary member is rupees 5 only.

If you have already filled in such form after 20-12-51, you should please hand over this form to any other Guru Bandhu & see that it is filled in & sent by him.

Thanking you

Yours in common devotion,

D. B. Rane.

Hon: Secretary

Shree Sai Baba Samsthan Shirdi.

---

*Note for Doctor* – It is advisable to make a short statement that those who do not send form by 14-2-52 will not be eligible for Bhakta membership.

## विनंति

कांहीं अपरिहार्य कारणामुळें या अंकास विलंब लागत आहे. तरी क्षमस्व. यापुढील अंक वेळींच पाठविला जाईल.

संपादक

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किमत रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र (मराठी) .... .... | ७ | ० | ० |
| २ | सच्चरित्र (इंग्रजी) .... .... | ४ | ० | ० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ० | २ | ० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] .... | ० | ८ | ० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ० | ३ | ० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक (इंग्रजी) .... .... | १ | ४ | ० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, शिरडी संस्थान, मु. शिरडी, पो. रहातें, जि. अहमदनगर

खजिनदार, वि. शा. कीर्तिकर, २१३, भन बिल्डिंग, चर्नीरोड, मुंबई नं. ४

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :–डॉ. के. भ. गव्हाणकर यांनीं, काळाचौकी रोड,
मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.
मुद्रक :–के. एल्. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग,
त्रिभुवन रोड, मुंबई ४